
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २३६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, १५ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

**ड्रायव्हर पाहिजे**
**फॉर्च्युनर कार साठी ड्रायव्हर पाहिजे**
१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२,
शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल,
जिल्हा-रायगड (महाराष्ट्र)
माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई- ४१०२०६
। संपर्क ।
मोबाईल : ८१०८४००२१४
Email : ekanathpatil4141@gmail.com

## भारताच्या दोन जहाजांनी पार केली होमुर्झ सामुद्रधुनी



**तेहरान :** मध्यपूर्वेत निर्माण झालेल्य युद्ध परिस्थितीमुळे जगभरातील तेल आणि गॅस आयात विस्कळीत झाली असताना भारताला दिलासा देणारी घटना शनिवारी (दि. १४) होर्मुझच्या सामुद्रधुनीत घडली. एलपीजी भरलेल्या दोन जहाजांनी होर्मुझ सामुद्रधुनी पार केली असल्याची माहिती केंद्रीय जहाज वाहतूक मंत्रालयाचे विशेष केंद्रीय सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले, शिवालिक आणि नंदा देवी ही जहाजे एलपीजी गॅस घेऊन निघाली असून त्यांनी होर्मुझची सामुद्रधुनी पार केली आहे. दोन्ही जहाजांमध्ये जवळपास ९२,७०० मेट्रिक टन एलपीजी भरलेला आहे. ही जहाजे १६ आणि १७ मार्च रोजी भारतातील बंदरांवर पोहचतील. दुसरी दिलासादायक बातमी म्हणजे युद्धाच्या पार्श्वभूमीवर आखाती क्षेत्रात अडकलेले सर्व भारतीय खलाशी सुरक्षित आहेत, असेही सिन्हा यांनी सांगितले.

# सुरळीत गॅस पुरवठ्यासाठी नियमावली

## अत्यावश्यक सेवांना राज्य सरकारचे प्राधान्य

**मुंबई : प्रतिनिधी**

इराण आणि इस्राईलदरम्यान निर्माण झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने राज्य सरकारने खबरदारीचे पाऊल उचलले आहे. घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने नियमावली जाहीर केली आहे.

राज्यात इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि नागरिकांमध्ये घबराट पसरू नये यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने सूक्ष्म नियोजन केले आहे. एलपीजी सिलिंडरच्या वितरणासाठी आता स्वतंत्र प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला असून त्यानुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, वसतिगृह, शासकीय खानावळ, मध्यान्ह भोजन योजना, अंगणवाडी अशा सर्व संस्थांना १०० टक्के गॅसपुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर



उपहारगृहांना ७० टक्के, तर औषध उद्योग, बीज प्रक्रिया आणि मत्स्यपालन व्यवसायांना ५० टक्के गॅसपुरवठा केला जाणार आहे.

राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुकास्तरावर तातडीने नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असून तक्रारींसाठी व्हॉट्सअॅप सुविधाही उपलब्ध केली जाईल. गॅस बुकिंग अॅप आणि मिस्ड कॉल सेवेतील तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे आदेश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणारी वाहने आणि गॅस एजन्सींना आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण पुरवण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर असेल. तेल कंपन्या आणि रेशनिंग नियंत्रकांना दररोजचा साठा आणि वितरणाचा अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक असेल.

गॅसपुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम किंवा घबराट निर्माण होऊ नये यासाठी ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक लोकप्रतिनिधींची मदत घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आगामी सण-उत्सवांच्या काळात सार्वजनिक संस्थांचा पुरवठा खंडित होणार नाही याची विशेष काळजी घेतली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सरकारने केले आहे.

### एलपीजीचा तुटवडा नाही -मुख्यमंत्री

देशात घरगुती गॅसचा कुठलाही तुटवडा नाही. केंद्र सरकार, गॅस कंपन्या आणि सचिवांनीही याबाबत स्पष्ट केलंय की, जितकी घरगुती गॅस सिलिंडरची मागणी आहे, तितका पुरवठा करण्यात येतोय. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याचे किंवा पॅनिक होण्याचे कोणतेही कारण नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

आपल्याकडे पुरेसा साठा उपलब्ध असून कुठल्याही प्रकारची टंचाई नाही, मात्र काही राजकीय पक्ष विशेषतः काँग्रेस जाणीवपूर्वक अफवा पसरवत आहेत, लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत आहेत, असा आरोपही त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

## स्वसंरक्षणातून महिलांमध्ये स्वाभिमान जागृतीचा संकल्प -आमदार प्रशांत ठाकूर

### प्राचीन युद्धकला प्राथमिक प्रशिक्षण वर्गाचा समारोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्राचीन युद्धकला प्राथमिक प्रशिक्षण हे केवळ शस्त्र चालवण्याचे नसून ते स्वतःबद्दलचा स्वाभिमान जागृत करण्याचे एक संकल्प शिबिर होते आणि हा संकल्प १०० टक्के यशस्वी झाला आहे. समाजात स्वाभिमानाने वावरण्यासाठी अशा प्रकारचे स्वसंरक्षण प्रशिक्षण प्रत्येक महिला भगिनीला मिळायला हवे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या पुढाकारातून प्राचीन युद्धकला प्राथमिक प्रशिक्षण वर्ग शहरातील लोकनेते दि.बा. पाटील शाळेच्या



मैदानावर ४ ते ११ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. त्याच्या सांगता समारंभात आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

या प्रशिक्षण वर्गात १० वर्षांवरील मुलींपासून ते महिलांपर्यंत अनेकींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रशिक्षणादरम्यान महिलांना प्राचीन युद्धकलेचे बारकावे आणि स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. या कलेचा सराव सातत्याने सुरू ठेवून आपल्यातील स्वधर्म आणि आत्मविश्वास जागृत ठेवण्याचे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी उपस्थित महिलांना केले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनामुळे पनवेलमधील महिलावर्गात उत्साहाचे वातावरण दिसून आले. **(पान २ वर..)**

## पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेत महाराष्ट्राची बाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने सुरू असलेल्या पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. निवासी घरांच्या छतावर सौर यंत्रणा बसविण्यात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले असून देशातील एकूण सौर संचांपैकी सुमारे २० टक्के वाटा एकट्या महाराष्ट्राचा आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. १४) दिली.

नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रात एक लाख आठ हजार ३२७ घरांमध्ये सौर यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. राज्याने या कामगिरीच्या जोरावर उत्तर प्रदेश आणि गुजरातसारख्या सौर ऊर्जेत आघाडीवर असलेल्या राज्यांनाही मागे सारले आहे.

## भाजपमध्ये काम करणाऱ्याला निश्चितपणे संधी मिळते -अरुणशेठ भगत



### सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील यांचा जाहीर सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीत अनेक वर्षांची मेहनत आणि कार्यकर्त्यांच्या पुण्याईमुळेच यश मिळाले. भाजपमध्ये काम करणाऱ्याला नक्कीच संधी मिळते, अशी भावना भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी नवनिर्वाचित सभापती रंजना वास्कर आणि उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्या जाहीर सत्कार समारंभावेळी व्यक्त केली.

पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीत यंदा पहिल्यांदाच भाजपने शेकापला हद्दपार करून आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. एकूण १६पैकी १५ जागांवर विजय मिळवत भाजपने पंचायत समितीवर आपला झेंडा फडकवला. या विजयानंतर करंजाडे गणाच्या रंजना वास्कर यांची सभापतीपदी, तर आदई गणाचे भूपेंद्र पाटील यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली. या ऐतिहासिक विजयाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. १३) पनवेल तालुक्यातील शेलघर येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

जोपर्यंत अंगात ताकद आहे, तोपर्यंत जनतेची सेवा अविरतपणे सुरूच राहील, असे भाजप नेते अरुणशेठ भगत म्हणाले. कार्यक्रमापूर्वी शेलघर गावामध्ये ढोल-ताशाच्या गजरात विजयी रॅली काढण्यात आली होती. यावेळी कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

## निवडक

### डोनाल्ड ट्रम्प समर्थक लॉरा लूमर यांनी मागितली माफी

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कट्टर समर्थक लॉरा लूमर यांनी शनिवारी (दि. १४) त्यांच्या काही भारतविरोधी सोशल मीडिया पोस्टसाठी माफी मागितील. त्या इंडिया टुडेच्या कॉनक्लेव्हमध्ये बोलत होत्या. लूमर म्हणाल्या, ट्वीटमध्ये लिहिलेल्या काही गोष्टी मी बोलायला नको होत्या. माझ्या वक्तव्यामुळे लोक दुखावले असतील तर मी माफी मागते. याशिवाय त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी मी लवकरच पुन्हा एकदा भारतात येईन, असा संदेश फोनवरून दिला असल्याचेही सांगितले.

### श्रीलंकेतून ८४ इराणी खलाशांचे मृतदेह रवाना

**कोलंबो :** अमेरिकेने हिंदी महासागरात इराणी युद्धनौका 'आयआरआयएस डेना'वर काही दिवसांपूर्वी हल्ला केला होता. या हल्ल्यात ठार झालेल्या ८४ इराणी खलाशांचे मृतदेह श्रीलंकेने परत इराणला पाठवले आहेत, तर हल्ल्यातून वाचलेल्या ३२ जणांवर रुग्णालयात उपचार करण्यात आले.

## फरार गांजा तस्कर अखेर जेरबंद

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

सुमारे २० वर्षांपासून फरार असलेल्या गांजा तस्कराला नेरळ पोलिसांनी अखेर अटक करत मोठे यश मिळवले आहे. विलास मनोहर मोहिते (रा. अहिल्यानगर) याला महाबळेश्वर (जि. सातारा) येथून जेरबंद करण्यात आले. हा आरोपी २००६ साली १४५ किलोहून अधिक गांजाच्या बेकायदेशीर वाहतुकीप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार होता.

सन २००६मध्ये नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेल्वे गेटजवळ बोलेरो जीपमधून गांजाची अवैध वाहतूक करत असताना रिक्षाला धडक देऊन अपघात झाला होता. पोलिसांच्या कारवाईपासून बचाव करण्यासाठी आरोपीने गांजासह जीप बेवारस सोडून पलायन केले होते. त्यानंतर तो तब्बल दोन दशकांपासून फरार होता.




नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवली. या कारवाईत हवालदार सचिन वाघमारे, अंमलदार राजाभाऊ केकान, आशू बेंद्रे व विनोद वांगणेकर यांनी आरोपीचा माग काढला. चौकशीत त्याने साथीदारांसोबत संगनमत करून १४५ किलो ६० ग्रॅम गांजा बोलेरो जीपमधून वाहतूक केल्याची कबुली दिली. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहे.

## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये मूट कोर्ट आणि जजमेंट रायटिंग स्पर्धा

### मान्यवरांची उपस्थिती; विद्यार्थ्यांनी दाखवले कौशल्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गोपनीयतेचा अधिकार या विषयावरील कायदेशीर गुंतागुंत समजून घेण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात शास्त्रार्थ २.० मूट कोर्ट आणि जजमेंट रायटिंग स्पर्धा २०२६चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून भावी कायदेतज्ज्ञांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि मूलभूत अधिकार यांच्यातील संघर्षावर प्रकाश टाकला.

या स्पर्धेसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती गोविंद सानप आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासह व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य अर्चना ठाकूर,




राहुल घरत उपस्थित होते.

स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी युक्तिवादाने आणि सखोल कायदेशीर विश्लेषणाने उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः मूट कोर्ट फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांनी मांडलेले कायदेशीर मुद्दे आणि जजमेंट रायटिंगमधील त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे होते.

स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी विधी क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांचे पॅनेल उपस्थित होते, ज्यामध्ये अॅड. चंद्रकांत निकम, अॅड. स्वप्नील पाटील, अॅड. डॉ. अश्विनी सिंह, अॅड. संदीप सिंह, अॅड. अश्विन अडवाणी, अॅड. कल्याणी मांगवे, अॅड. निर्मल चोपडा, अॅड. ध्वनी चोपडा, अॅड. निलेश बागडे, अॅड. निनाद शेंडगे आणि अॅड. महेश स्वामी यांचा समावेश होता.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सहाय्यक प्राध्यापिका नेहा काची यांनी निमंत्रक म्हणून, तर बीएएलएलबी समन्वयक सहाय्यक प्राध्यापिका धनश्री कदम यांनी आयोजक म्हणून जबाबदारी सांभाळली.

## कार्ला येथील एकवीरा देवीच्या चैत्री यात्रेचा मान यंदा पनवेल कोळीवाड्याला



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला गड (वेहेरगाव, लोणावळा) येथील आगरी-कोळी समाजाची कुलस्वामिनी एकविरा देवीची चैत्री यात्रा व मानाच्या पालखी सोहळ्याची उत्सुकता निर्माण झाली आहे. हा भव्य आणि भक्तिमय पालखी सोहळा बुधवारी (दि. २५) मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

आई एकविरा देवीच्या चैत्री यात्रेला आगरी-कोळी समाजासह राज्यभरातून हजारो भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात. या यात्रेत मानाच्या पालखीला विशेष धार्मिक महत्त्व असून दरवर्षी पारंपरिक पद्धतीने एका कोळीवाड्याला पालखी नेण्याचा मान दिला जातो. या परंपरेनुसार पनवेल, पेण आणि ठाणे कोळीवाडा हे पालखीचे मानकरी मानले जातात. यंदा हा मान पनवेल कोळीवाड्याला मिळाल्याने भाविकांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर पनवेल कोळीवाड्यात पालखी सोहळ्याच्या तयारीला वेग आला आहे. संपूर्ण परिसरात कागदी पताका, दारोदारी रांगोळ्या, मोत्याच्या माळेची पालखीला आकर्षक सजावट करण्यात येत असून फुलांनी पारंपरिक सजावटीने पालखी सजविण्याचे काम सुरू आहे.

ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि गुलालाच्या उधळणीत आई एकविरा देवीच्या जयघोषात ही मानाची पालखी पनवेल कोळीवाड्यातून कार्ला गडाकडे भक्तिभावाने मार्गस्थ होणार आहे. या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार असल्याने परिसरात उत्सव आणि भक्तीचे वातावरण निर्माण होणार आहे.

## पनवेल मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीची पाहणी





**पनवेल :** येथील महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीची माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांनी महापौर नितीन पाटील व उपमहापौर प्रमिला पाटील यांच्यासमवेत पाहणी केली. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांना बसण्याच्या सुविधांसाठी गोदरेज आणि फेदरलाईट या दोन कंपन्यांकडून तयार फर्निचरचीही पाहणी करण्यात आली. सर्व लोकप्रतिनिधींनी दोन्ही कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, भाजपचे शहर अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष व नगरसेवक दशरथ म्हात्रे, हितेन शेट्टी कन्सल्टंटचे प्रतिनिधी, कॉन्ट्रॅक्टर, इंटेरिअर पाहणारे हर्ष कन्स्ट्रक्शनचे प्रतिनिधी, स्थायी समिती सदस्य, नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते.

# वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयांना स्वायतत्ता देण्यासाठी समिती स्थापन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या संस्थांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शासन निर्णय जारी केला आहे.



स्वायत्ततेच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्थांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन क्षमता आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे समितीचे सदस्य सचिव असतील.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची सध्याची प्रशासकीय व शैक्षणिक संरचना, स्वायत्त दर्जा देण्याची आवश्यकता, संभाव्य लाभ, तसेच देश-विदेशातील यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास समिती करणार आहे. यामध्ये एम्स, पीजीआय चंदीगड आणि टाटा मेमोरिअलसारख्या संस्थांच्या व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

स्वायत्त महाविद्यालयांसाठी संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषद यांची रचना, व अधिकार. संचालक/अधिष्ठाता यांचे अधिकार व जबाबदाऱ्या. स्वायत्त व्यवस्थेसाठी आवश्यक आर्थिक व प्रशासकीय यंत्रणेबाबत शिफारस करणे. आर्थिक स्वातंत्र्य, अंतर्गत महसूल निर्मिती, लेखापरीक्षण व्यवस्था, तसेच कर्मचारी व अध्यापकांसाठी नवीन सेवा अटी आणि धोरणे याबाबत समिती शिफारसी करणार आहे. आवश्यक कायदेशीर, प्रशासकीय व धोरणात्मक बदलांबाबतही समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे.

शासकीय शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देताना त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता प्रशासकीय व आर्थिक बाबींमध्ये अधिकारांचे हस्तांतरण सुचवणे. स्वायत्त संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी देखरेख, मूल्यमापन व उत्तरदायित्व यंत्रणेबाबत शिफारस करणे. धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याकरिता आराखडा तयार करणे आदि कामे समिती करणार आहे.

### तीन महिन्यांत अहवाल देणार

***समितीने सविस्तर अहवाल तीन महिन्यांच्या आत शासनाला सादर करायचा आहे. समितीला आवश्यक ती माहिती आणि तांत्रिक सहाय्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत (डीएमईआर) उपलब्ध करून देण्यात येणार असून सदस्यांना शासन नियमानुसार मानधन, प्रवास खर्च व इतर भत्ते देण्यात येणार आहेत.***

# खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते विविध शासकीय दाखल्यांचे वाटप

## पेण मांगरुळ येथे महाराजस्व समाधान शिबिराला प्रतिसाद

**पेण : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाचा दुसरा टप्पा आज कामार्ली महसूल मंडळातील मांगरुळ येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात खासदार धैर्यशील पाटील, प्रांत अधिकारी प्रवीण पवार तहसीलदार तानाजी शेजाळ, बाजार समिती सभापती महादेव मानकर, खरेदी विक्री संघ चेअरमन रघुनाथ तथा बापू दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे रयतेप्रती असणारे प्रेम जिव्हाळा आपुलकी आणि कल्याण राज्य निर्मिती याची प्रेरणा घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सामान्य जनतेला एकाच ठिकाणी महसूल कृषी शैक्षणिक व आदिवासी बांधवांना लागणारे दाखले विना तक्रार व तातडीने देण्याचा हा स्तुत्य उपक्रम आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना याचा पूरेपूर लाभ मिळत आहे हे या राजस्व समाधान शिबिरात दिसून येते.आपण सर्वानी याचा लाभ घ्यावा असे धैर्यशील पाटील यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. यावेळी त्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते यावेळी विविध शासकीय दाखल्याचे लाभार्थीना वाटप करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीराचा हा दुसरा टप्पा मांगरुळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडला यावेळी नायब तहसीलदार नितीन परदेशी, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, मावळा प्रतिष्ठानचे मंगेश दळवी, जिल्हा परिषद सदस्या ताई जोमा दरवडा, जिल्हा परिषद सदस्य जनार्दन भस्मा, पंचायत समिती सदस्या कमळ पवार, बाजार समिती संचालक जयंत नारकर,कामार्ली माजी सरपंच गजानन मोरे, वाक्रुळ सरपंच गणेश गायकर, बाळगंगा संघर्ष समिती अध्यक्ष अविनाश पाटील याशिवाय मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहायक आदिवासी प्रकल्प विभाग कर्मचारी आरोग्य कर्मचारी कोतवाल पोलीस पाटील ग्रामपंचायत कर्मचारी व विभागातील ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. शिबिराचे आयोजन सुरेख करण्यासाठी मावळा प्रतिष्ठानचे रूपेश दळवी आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

**एक खिडकी योजना' पद्धतीने सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहणार असल्याने नागरिकांच्या विविध महसुली कामांचे तातडीने निराकरण होणार असून या अभियानामुळे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान होईल, महसुली तक्रारींचे तातडीने निवारण करणे, प्रलंबित प्रकरणांना गती देणे तसेच प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.**

**-प्रवीण पवार, प्रांत अधिकारी**

# कोर्लई येथे भीषण पाणीटंचाई

## ग्रामपंचायतीत संवाद-चर्चा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून गेले महिनाभर पाण्यावाचून ग्रामस्थांचे बेहाल झाले आहे. याबाबत कोर्लई ख्रिश्चनपाडा ग्रामस्थाची कोर्लई ग्रामपंचायतीत संवाद-चर्चा घडून आली.



कोर्लई गावात गेल्या महिनाभरात भीषण पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असून काही वर्षापुर्वी नव्याने जलजीवन पाणी पुरवठा योजना कार्यन्वित करण्यात आली आहे, कोर्लई गावात जनजीवन पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाणीपुरवठा फणसाड धरणातून केला जातो. सध्यस्थितीत मुरूड तालुक्यातून कोर्लई येथील मुख्यः रस्तावर रेवस-रेड्डी अंतर्गत रस्त्याचे नुतनीकरण, क्रॉकिटीकरण व रूंदीकरणाचे काम सुरू आहे. तसेच मांडळा ते फणसाड धरण या मार्गात सुध्दा अनेक ठिकाणी नुतन रस्तासाठी खोदाई वगैरे कामे करण्यात आली आहेत. यामध्ये रस्ता रूंदीकरणख् क्रॉकिटीकरण व नुतनीकरण कामात खोदाई काम करताना ठेकेदारांच्या निष्काळजीपणाने ठिकठिकाणी जनजीवन पाणी पुरवठा योजनेंतर्गत असलेली पाईप लाईन फुटली गेली.

या फुटलेल्या पाईप लाईनची तात्पुरती दुरूस्ती केली जाते, परंतू फुटलेल्या पाईपलाईन मधून पाणी झिरपत रहाते, परिणाम कोर्लई गावापर्यंत पाण्याचा प्रेशर पाणीपुरवठा करण्यास सुयोग्य होत नसल्याने कोर्लई गावात पाणी मिळत नाही. यामुळे एकप्रकारे कुत्रीम पाणी टंचाई कोर्लई गावात निर्माण झाली आहे.

अखेर या पाणीटंचाई समस्येवर कोर्लई ग्रामपंचायतीत सरपंच व ग्रामस्थ यांच्यामध्ये संवाद-चर्चा घडुन आली. यावेळी ग्रामस्थांनी सरपंच राजश्री मिसाळ यांचेकडे पाणी समस्येविषयी गाऱ्हाणे मांडले, यावेळी सरपंच राजश्री मिसाळ यांनी सध्यस्थितीत मुरूड तालुक्यातून कोर्लई येथील मुख्यः रस्तावर रेवस-रेड्डी अंतर्गत रस्त्याचे नुतनीकरण, क्रॉकिटीकरण व रूंदीकरचे काम सुरू आहे. तसेच मांडळा ते फणसाड धरण या मार्गात सुध्दा अनेक ठिकाणी नुतन रस्तासाठी खोदाई वगैरे कामे करण्यात आली आहेत.

यामध्ये रस्ता रूंदीकरण क्रॉकिटीकरण व नुतनीकरण कामात खोदाई काम करताना ठेकेदारांच्या निष्काळजीपणाने ठिकठिकाणी जनजीवन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत असलेली पाईप लाईन फुटली गेली. या फुटलेल्या पाईप लाईनची तात्पुरती दुरूस्ती केली जाते, परिणाम कोर्लई गावापर्यंत पाण्याचा प्रेशर पाणी पुरवठा होत नसल्याचे म्हटले.

दरम्यान, कोर्लई ख्रिश्चनपाडा येथील ग्रामस्थ व शिवसेना युवासेना उपतालुका प्रमुख विकी वेगस यांनी संबधीत खात्याना कोर्लई गावातील पाणी पुरवठा समस्येबाबत पत्र दिले आहे. संबधीतानी त्वरीत लक्ष्य देवून पाणी पुरवठा व्यवस्थीत व सुरळीत करण्यासाठी रस्ता नुतनीकरणाने व रूंदीकरणात पाईप लाईन विस्कळीत झाल्याने नव्याने पाईप लाईन करण्यात यावी, अशी मागणी कोर्लई सरपंच राजश्री मिसाळ यांनी केली आहे.

दरम्यान, कोर्लई ग्रामपंचायतीचे वतीने ख्रिश्चनपाडा ग्रामस्थांना टॅकरने पाणीपुरवठा कोर्लई ग्रामपंचायत मार्फत करण्यात येत असल्याचा खुलासा सरपंच राजश्री मिसाळ यांनी केला.

# पाणीपट्टी देयके भरण्याचे सिडकोकडून आवाहन

## थकबाकी न भरल्यास होणार दंडात्मक कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको प्रशासनिक क्षेत्रातील ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकीत देयकांचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले असून, विहित मुदतीमध्ये प्रलंबित देयकांचा भरणा करण्यास असमर्थ ठरणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन पाणी पुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सिडको प्रशासनिक क्षेत्रातील गावांना आणि नोडना सिडकोतर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी पुरवठा नियमित आणि अखंडित करण्यासाठी तसेच देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यासाठी ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करणे आवश्यक आहे. याकरिता ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकबाकीचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आला आहे. विहित मुदतीत थकलेली पाणी देयके न भरल्यास संबंधित ग्राहकांवर, सिडकोच्या नियमानुसार दंडात्मक कारवाई करून त्यांचा पाणी पुरवठाही खंडित होऊ शकतो, असा इशार देखील सिडकोतर्फे देण्यात आला आहे.

ग्राहकांना पाणी देयके ऑनलाइन पद्धतीने, अधिकृत संकलन केंद्रांवर किंवा सिडको कार्यालामध्ये भरण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच पाणीपट्टी देयकामध्ये काही त्रुटी अथवा शंका असल्यास संबंधित सिडको कार्यालयासोबत त्वरित संपर्क साधण्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे. जेणेकरून यासंर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. संबंधित ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करून पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सिडकोला सहकार्य करण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.

# पत्रकारितेतील एआय वापरावर ब्रिजेश सिंह यांचे मार्गदर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर झपाट्याने वाढत असला तरी एआयला वास्तव समजण्याची क्षमता नसते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सत्य शोधण्याची जबाबदारी आणि समाजाचा विश्वास हे पत्रकारितेचे मूलभूत बळ असल्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळातही पत्रकारितेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे, असे मत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले.

पत्रकारांनी एआयकडे धोका म्हणून न पाहता कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पाहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित 'एआय परिषद २०२६'चे उद्घाटन महासंचालक श्री. सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी एआयमुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात होणारे बदल, संधी आणि आव्हाने यावर सविस्तर भाष्य केले. यावेळी संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, विश्वस्त देवदास मटाले, अजय वैद्य, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. सिंह म्हणाले, मानव इतिहासात ज्ञान लोकांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया छपाई तंत्रज्ञानाच्या शोधानंतर मोठ्या प्रमाणावर बदलली. पूर्वी ज्ञान काही विशिष्ट गटांपुरते मर्यादित होते, मात्र छपाईमुळे ते सर्वसामान्यांपर्यंत पोहचले. त्यानंतर प्रसारमाध्यमांचा विकास झाला. दूरदर्शन सुरू झाले तेव्हा वृत्तपत्रांना धोका वाटत होता; डिजिटल माध्यमे आली तेव्हा टीव्हीला धोका वाटू लागला. मात्र या सर्व बदलांनंतरही वृत्तपत्रांनी आपले अस्तित्व टिकवले. भविष्यातही पत्रकारिता टिकेल, मात्र जे काही काम स्वयंचलित होऊ शकते ते एआयमुळे स्वयंचलित होणार हेही वास्तव आहे, असे त्यांनी नमूद केले.

आज पत्रकारितेत एआयचा वापर वाढत आहे. जगात काही ठिकाणी पूर्णपणे स्वयंचलित 'वन-मॅन न्यूज रूम' तयार होत असून बातम्यांचे संकलन, लेखन, संपादन, फॅक्ट-चेकिंग आणि पेज लेआउटसारखी कामे एआयच्या साहाय्याने केली जात आहेत. वित्त, क्रीडा आदी अनेक क्षेत्रांतील बातम्या मोठ्या प्रमाणावर स्वयंचलित पद्धतीने तयार होऊ शकतात. त्यामुळे पत्रकारितेतील कामकाजाची पद्धत बदलत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी श्री. चव्हाण यांनी स्वागतपर भाषणात सांगितले की, तंत्रज्ञान चांगले की वाईट हे त्याच्या वापरावर अवलंबून असते, त्यामुळे एआयचा योग्य आणि जबाबदारीने वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात श्री. शिर्के यांनी सांगितले की, एआयसारख्या नव्या तंत्रज्ञानाची प्राथमिक ओळख अनेकांना असली तरी त्याचे सखोल ज्ञान अशा परिषदांमधूनच मिळते. त्यामुळे या विषयावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणे पत्रकारांसाठी महत्त्वाचे आहे. राज्यात एआयचा वापर वाढविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने आग्रही असून शासनाच्या कामकाजातही तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर देत आहेत. उपाध्यक्ष राजेंद्र हुंजे यांनी सूत्रसंचालन केले. प्रधान सचिव श्री. सिंह यांच्या हस्ते परिषदेतील वक्त्यांचा सत्कार करण्यात आला.

# कर्जतमध्ये स्पर्धा परीक्षा कार्यशाळा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील शतकोत्सवी श्री लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालय व ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने शनिवार २१ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते ४.३० या कालावधीत कर्जतमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) आणि संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) परीक्षेसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात रॉयल गार्डन, कर्जत येथे नि:शुल्क स्वरूपाच्या 'एक दिवसीय कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यशाळेला मर्यादित प्रवेश दिले जाणार असल्याने इच्छुक अभ्यासकांनी आपल्या नावाची नोंद त्वरित करावी असे आवाहन संस्थेचे चिटणीस संदीप भोसले यांनी केले आहे. नावनोंदणीची अंतिम तारीख १८ मार्च २०२६ असेल.

अधिक माहितीसाठी संपर्क दिनेश रणदिवे (९८२३९३८६३९) व ग्रंथपाल रामदास गायकवाड (९०९६३५१८२८) यांच्याशी साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हरवलेली मुलगी नगरसेवक सोनींमुळे पालकांच्या स्वाधीन

**पनवेल : वार्ताहर**

पटेल मोहल्ला परिसरातून हरवलेली मुलगी नगरसेवक राजू सोनी व त्यांचे सहकारी मंदा देसाई यांच्या प्रयत्नातून पनवेल शहर पोलिसांनी पालकांच्या स्वाधीन केले.

सदरची मुलगी ही पटेल मोहल्ला परिसरातून हरवली होती. त्यावेळेस काही नागरिकांना ती हरवले असल्याचे लक्षात आले. त्यावेळी यातील एका इसमाने नगरसेवक राजू सोनी यांना फोनद्वारे कळवले. मुलीचा शोध घेत असता वेळी सदर मुलगी मिरची गल्ली येथे एका ठिकाणी असल्याचे समजतले. त्यावेळी नगरसेवक राजू सोनी व त्यांचे सहकारी मंदार देसाई यांनी तत्काळ तेथे जाऊन त्या मुलीला आपल्या ताब्यात घेऊन स्वतः च्या गाडीत बसवून पनवेल शहर पोलीस ठाण्यात आणली व यांच्या ताब्यात दिले.

ही मुलगी हरवली आहे याची तक्रार तिच्या आईने पनवेल शहर पोलीस ठाण्यात येऊन केली होती. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी तात्काळ त्या मुलीच्या आईस फोन करून बोलवून सुखरूप त्या मुलीच्या आईच्या स्वाधीन केले. त्यामुळे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस कर्मचारी व मुलीच्या आईने यांनी राजू सोनी व मंदार देसाई यांचे खूप आभार मानले.



## पान १ वरुन

### स्वसंरक्षणातून महिलांमध्ये स्वाभिमान जागृतीचा संकल्प -आमदार प्रशांत ठाकूर

प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी महिलांनी आपल्या कौशल्याचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. महिलांना केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम करणे हाच या शिबिराचा मुख्य उद्देश नसून त्यांना मानसिकदृष्ट्या कणखर बनवणे हा होता, जो पूर्णपणे साध्य झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी महापौर नितीन पाटील, भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारूशीला घरत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, नगरसेवक बबन मुकादम, राजू सोनी, सुमित झुंझारराव, नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, ॲड. शिवानी घरत, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर उपाध्यक्ष केदार भगत, प्रभाग १९चे अध्यक्ष पवन सोनी, प्रशांत शेट्ये, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष मनीषा बहिरा, कविता ठाकूर, सोशल मीडिया प्रभारी संजीवनी भोईर यांच्यासह पदाधिकारी आणि महिलावर्ग उपस्थित होता.

# रसायनी पिल्लई एचओसी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

पिल्लई एचओसी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, रसायनी येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यार्थ्यांचा, प्राध्यापकांचा तसेच कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमामध्ये एनएसएस स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावत रक्तदानाबाबत जनजागृती केली व विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. शिबिरादरम्यान एकूण १४१ रक्ताच्या पिशव्या संकलित करण्यात आल्या, जे समाजासाठी एक महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.

या रक्तदान शिबिराचे समन्वयक प्रा. विक्रम पवार तसेच भाजप गुळसुंदे विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे यांनी शिबिराचे नियोजन व अंमलबजावणी यशस्वीरीत्या पार पाडली. वैद्यकीय पथकाने रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करून सुरक्षिततेची सर्व व्यवस्था केली होती.

महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी तसेच एनएसएस विभागाने रक्तदान करणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवकांचे विशेष कौतुक केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ होत असून भविष्यातही असे उपक्रम राबवले जातील, असे यावेळी सांगण्यात आले.



# निवडक

## दंगा काबू योजनेची रंगीत तालीम



**पनवेल :** तालुका पोलीस ठाणे हद्दीतील कोन सावळा रोड, इंडियाबुल्स सोसायटी समोर दंगा काबू योजनाची रंगीत तालीम राबविण्यात आली. वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम राबविण्यात आली. यावेळी दोन पोलीस निरीक्षक, सहा पोलीस अधिकारी, ३२ अंमलदार यांच्यासह अग्निशमन दलाचे एक अधिकारी व पाच कर्मचारी तसेच एक रुग्णवाहिका एक डॉक्टर आणि दोन कर्मचारी उपस्थित होते.

## खारघरमध्ये घरफोडी

**पनवेल :** घरफोडी करून चोराने ८० हजार रुपये रोख रक्कम आणि चांदीचे ताट, कॉईन, गळ्यातला सेट, अंगठ्या चोरून नेले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकाश अनवेकर हे आशीर्वाद रो हाऊस, सेक्टर १२, खारघर येथे राहत असून ते अयोध्या येथे गेले होते. यावेळी एका मोलकरणीने त्यांना त्यांच्या घराच्या कोयंडा उचकटलेला असल्याचे सांगितले. ते चित्रकुट येथून विमानाने खारघरला आले. त्यावेळी चोराने चांदीचे ताट, वाट्या, चमचे, कमरपट्टा, कॉईन, गळ्यातला सेट, अंगठ्या आणि रोख रक्कम चोरून नेली.

## स्पावर कारवाई; तिघांवर गुन्हा

**पनवेल :** खारघर पोलिसांनी स्पावर कारवाई करत अदनान हनीफद शेख (चालक), शबीना मोहम्मद खलील शेख, जैनाब नरुल्हा शरीफ शेख या तिघां विरोधात गुन्हा दाखल केला. खारघर, सेक्टर दोन, ग्रो मोअर बिल्डिंग येथील वेलनेस स्पा या ठिकाणी महिला थेरपीस्ट या ग्राहकांची अश्लील वर्तन करत असून तेथील स्पा चालक त्यांना मदत करत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी य ठिकाणी छापा टाकला. यावेळी महिला थेरपीस्ट तिच्या समोर असलेल्या ग्राहकाला अश्लील आणि भिभत्स साळे करत असल्याचे दिसून आले.

## पोलीस ठाण्यात स्नेहमिलन कार्यक्रम



**पनवेल :** जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे हद्दीतील महिला दक्षता समिती सदस्य, महिला पोलीस पाटील, महिला सरपंच, महिला पंचायत समिती सदस्य यांच्या स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित केला होता. वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम झाल्यानंतर महिला दक्षता समिती सदस्य यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत महिला सुरक्षा अनुषंगाने, सायबर क्राईम, इत्यादी विषयावर चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात २० पदाधिकारी, व पोलीस ठाण्याकडील महिला पोलीस अधिकारी, महिला पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## टपरीचालकाला चॉपरने मारहाण

**पनवेल :** टपरी चालकाकडून घेतलेल्या सिगारेटच्या पैशांची विचारणा केली असता चॉपर सारख्या हाताने वार करून जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फरहान हसन गोलंदाज हा तळोजा सेक्टर २२ येथे राहत असून रेल्वे फाटक सेक्टर २१, फेस टू तळोजा येथे त्यांची पान टपरी आहे. यावेळी दोन अनोळखी व्यक्ती मोटर स्कूटी वरून आले आणि सिगारेट मागितला. पैशांची मागणी केली असता त्यांनी पैसे देण्यास नकार दिला आणि तेथून जाऊ लागले. यावेळी पैशांची मागणी केली असता एका इसमाने फरहान याच्यावर चॉपर सारख्या हत्यार काढून डोक्यात आणि कपाळाच्या वर वार केला तर दुसऱ्या व्यक्तीने हाताने मारहाण केली. यात फरहान हा जखमी झाला.

# घरफोडी करणारे त्रिकुट गजाआड

## गुन्हे शाखेने ३६ लाखांचे दागिने केले हस्तगत



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीमध्ये घराच्या मुख्य लाकडी दरवाज्याचे लॅच तोडून सुमारे ३० तोळे वजनाचे सोने-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण ३६ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरणाऱ्या त्रिकुटाला २४ तासाचे आत गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाने अटक केली आहे.

फिर्यादी रूबी पात्रो यांचे कळंबोली येथील राहते घरी अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य लाकडी दरवाज्याचे लॅच तोडून सुमारे ३० तोळे वजनाचे सोने-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण ३६ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल घरफोडी चोरी केल्याची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष २चे अधिकारी व अंमलदार यांनी तत्काळ भेट देवुन गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासावरून आरोपी पवन जाधव (वय २५, रा.डायघर), सुमित जाधव (वय २२, रा.पडले) आणि शिवाजी राठोड (वय २३, रा.पडले) यांना डायघर गांव येथे सापळा रचून शिताफीने ताब्यात घेवून अटक केले. गुन्ह्याचे तपासादरम्यान अटक आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलेले सुमारे ३० ग्रॅम वजनाचे ३६ लाख किंमतीचे सोने-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत.

ही उल्लेखनीय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, सहाय्यक निरीक्षक एकनाथ देसाई, उपनिरीक्षक संजय पवार, अभिजित देशमुख, पोहवा दुधाळ, हवालदार जोशी, पोहवा जेजुरकर, पांचाळ, सावंत, राउत, पाटील, धनवटे, कोपरकर, नाईक मोरे, गायकवाड, कोळी, शिपाई तांदळे व चापोना सोनवलकर यांनी केली आहे.

# दुहेरी मर्डरच्या गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांकडून अटक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुहेरी मर्डरच्या गुन्ह्यातील आरोपीला तळोजा पोलिसांनी दहा तासाच्या आत अटक केली. तुहीन बीश्वरूप घोष (राहणार तळोजा एमआयडीसी) असे आरोपीचे नाव आहे.

आयजीपीएल तळोजा एमआयडीसी येथील रस्त्यावर ३ मार्च रोजी एक सायकलस्वार मृत अवस्थेत आणि मोटरसायकलवरील व्यक्ती जखमी अवस्थेत पडलेला पोलिसांना दिसून आला. पोलिसांनी पाहणी केली असता जखमींना अज्ञाताने डोक्यात कोणत्या तरी हत्याराने मारून हत्या केल्याची आणि जखमी केल्याचे समजले. त्यानुसार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. काही वेळाने जखमी व्यक्तीचादेखील मृत्यू झाला. तळोजा पोलिसांनी आरोपींना शोधण्यासाठी पथके तयार केली.

सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे गुन्हयातील आरोपीला दहा तासाच्या आत ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता आरोपी हा आयजीपीएल तळोजा एमआयडीसी येथे सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. त्याच्याकडे पैसे नसल्याने तो वैफल्यग्रस्त झाला होता. त्याने रागाच्या भरात लोखंडी पाईप घेऊन रस्त्याने जाणारा सायकलस्वार राजू बासुमतारी (वय २९) याच्या डोक्यावर लोखंडी पाईपने फटके मारले आणि त्याला ठार मारले.

यावेळी साईनाथ भुऱ्या पाटील याने आरोपीला का मारहाण करतो असे विचारले असता आरोपीला राग आला आणि त्याने साईनाथ यालादेखील लोखंडी पाइपने डोक्यात मारहाण करून ठार मारले. यातील आरोपीला पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास केला जात आहे.

# कोंबिंग ऑपरेशनदरम्यान २७ किलो गांजा आणि भांगेच्या गोळ्या जप्त




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोंबिंग ऑपरेशनदरम्यान तळोजा पोलिसांनी देवीचा पाडा येथे सापळा लावून २७ किलो गांजा आणि १४ किलो भांगेच्या गोळ्या असा एकूण ३४ लाख २२ हजारचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

१२ मार्च ते १३ मार्च दरम्यान रात्री तळोजा पोलिसांनी तळोजा परिसरात कोंबिंग ऑपरेशन राबवले. यावेळी देवीचा पाडा येथे मधुकर म्हात्रे यांची चाळ, रूम नंबर चार या ठिकाणी छापा टाकून अमली पदार्थ जप्त करण्यात आले. या प्रकरणी सागर चिंतामणी महंतो (वय ६०), सावित्री सागर महंतो (वय ४८) या दोघांना अटक करण्यात आली. तसेच कोंबिंग ऑपरेशन दरम्यान बेकायदा दारू विक्री प्रकरणी दोन गुन्हे दाखल करण्यात आले. मोटर वाहन कायद्यान्वये ३९ वाहनांवर कारवाई करण्यात आली तसेच दोन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्यात आली.



**पनवेल : पंचायत समितीच्या सभापती रंजना सदाशिव वास्कर यांनी पदाचा कारभार स्वीकारल्यानंतर तालुक्यातील आपटा घेरावाडी येथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी पंचायत समिती सदस्य मयुर शेलार, आपटा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच ज्ञानेश्वर भोईर, सदस्य दामू माडे, दर्शन भोईर, राजू देशमुख, चव्हाण, ग्रामसेवक कैलास मोरे, जनार्दन सावंत, गणपत पिरकड, आयत्या माडे, संतोष पारधी आदी घेरावाडी ग्रामस्थ उपस्थित होते.**

# हास्य क्लबतर्फे महिलांचा सत्कार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कर्नाळा हास्य क्लब पनवेलतर्फे नुकताच हास्य क्लबच्या महिला संजीवनी मोरे, सुलभा पावसकर व गायत्री देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला तसेच संजीवनी मोरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला.

यावेळी हास्य-क्लबचे प्रशिक्षक मधुकर नाझरे, जयंतीलाल पंड्या, प्रभाकर पानारे, आर.जी. पाटील, रवींद्र देसाई, नानालाल पोपट, शशिकांत वाळुंज, गजानन भगत, राजकुमार ताकमोगे व महेंद्र जेठवा या हास्य क्लबच्या सदस्यांनी सत्कारमूर्ती महिलांना शुभेच्छा दिल्या.

रोज सकाळी ६ ते ७ या कालावधीत पनवेल तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर नियमितपणे हास्य क्लबची प्रात्यक्षिके सुरू असतात. यामुळे परिसरातील वातावरण आल्हाददायक बनते.

# उरणमध्ये पीएनजी ज्वेलर्सच्या नवीन शोरूमचे उद्घाटन



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण शहरात प्रसिद्ध ज्वेलरी ब्रँड यांच्या नवीन भव्य शोरूमचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. ग्रँड उरण सेंट्रल येथे आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या नव्या शोरूममध्ये सोन्याचे, हिऱ्याचे तसेच पारंपरिक आणि आधुनिक डिझाईनचे विविध दागिने उपलब्ध करण्यात आले आहेत. उरण परिसरातील ग्राहकांना आता दर्जेदार आणि आकर्षक दागिने स्थानिक पातळीवरच मिळणार असल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

उद्घाटनावेळी बोलताना माधुरी दीक्षित यांनी पीएजी ज्वेलर्सच्या गुणवत्तेचे कौतुक करत उरण शहरात नवीन शोरूम सुरू झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर तसेच उरण परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनानिमित्त ग्राहकांसाठी सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जवर विशेष सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांनी या ऑफरचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

या नवीन शोरूममुळे उरण शहराच्या व्यावसायिक विकासात आणखी भर पडणार आहे. त्याचप्रमाणे दागिने खरेदीचा नवा पर्याय उपलब्ध झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रोडपाली येथे स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ७ मधील रोडपाली विभागात गुढीपाडवा, रामनवमी व हनुमान जयंती या सणांच्या पार्श्वभूमीवर घनकचरा व स्वच्छता विभागाच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेमध्ये पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, सामाजिक कार्यकर्ते रविनाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते शिवम पाटील यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. स्वच्छता निरीक्षक हरेश बबन कांबळे, सुपरवायझर दीपक म्हात्रे, हर्षद पाटील, प्रमोद भोईर, सुजय मढवी, मोहनिष कांबळे तसेच स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

या मोहिमेत रोडपाली गावातील मुख्य रस्ते, आतील गल्ल्या तसेच पटांगण परिसर स्वच्छता दूतांच्या माध्यमातून स्वच्छ करण्यात आले.



# जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा तेजस्विनी सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल, आदर्श महिला मंडळ, पदवीधर प्रकोष्ठ भाजपा, महिला मोर्चा भाजप पनवेल आणि सुवर्ण सखी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मातृत्व ते नेतृत्व, स्त्रीच्या प्रवासाचा सन्मान या विशेष कार्यक्रमात तेजस्विनी सन्मान २०२६ अंतर्गत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांचा गौरव करण्यात आला.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्राप्त झालेल्या तब्बल २२४ नामांकनांमधून २१ विविध क्षेत्रांतील २२ तेजस्विनींची निवड करून त्यांच्या जिद्दीचा, संघर्षाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान करण्यात आला. अभिनेते, दिग्दर्शक व सूत्रसंचालक चला हवा येऊ द्या फेम डॉ. निलेश साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सादर झालेला वहिनीसाहेब सुपरस्टार हा विशेष कार्यक्रम प्रेक्षकांसाठी आनंदाचा आणि उत्साहाचा अविस्मरणीय क्षण ठरला.

विधानपरिषद आमदार तथा भाजप महिला मोर्चा, प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी उपस्थिताना ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन करत सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी १२००हून अधिक महिलांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाला मोहिनी विक्रांत पाटील, प्रिया मुकादम (जिल्हाध्यक्ष, महिला मोर्चा, रायगड), चारुशिला घरत (सरचिटणीस, महिला मोर्चा, रायगड), प्रमिला पाटील (उपमहापौर, पनवेल महानगरपालिका), राजश्री वावेकर अनेक मान्यवरांची प्रेरणादायी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे आयोजक आदर्श शैक्षणिक समुहाचे चेअरमन तथा पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते व आदर्श समूहाच्या संचालिका संगीता विसपुते यांच्या पुढाकारातून हा सोहळा अधिक भव्य, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला. प्राचार्य डॉ.सीमा कांबळे यांनी केलेल्या काव्यत्मक सूत्रसंचलनाने कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत प्राप्त झाली.

# उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये पदवी प्रदान सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कुलमध्ये शनिवारी (दि.१४) पूर्वप्राथमिक विभागाच्या सिनिअर केजी विद्यार्थ्यांचा Graduation डे म्हणजे पदवी प्रदान सोहळा समारंभ अत्यंत आनंदी आणि उत्साही वातावरणात पार पडला.

या कार्यक्रम साठी सौं. ललिता सिंग (आर. एस पी ऑफिसर महाराष्ट्र, कब्बडी खेल आंतरराष्ट्रीय खेळाडू), मुक्ता खटावकर (मुख्याध्यापिका), दिनेश देशमुख मॅनेजमेंट कमिटी मेम्बर, स्थानिक स्कुल कमिटी मेम्बर आदी मान्यवर उपस्तित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या मनोगतात लहानग्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना प्राथमिक शिक्षणाच्या नव्या टप्प्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासाचा आढावा घेत त्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

छोट्या-छोट्या Graduation Cap परिधान करून मंचावर चालत येताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि आत्मविश्वास पाहून उपस्थित पालक भावूक झाले. विद्यार्थ्यांनी गाणी, नृत्य व छोटेखानी मनोगत सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.



**उरण : येथील अवघ्या सहा वर्षीय मानस पाटील याने अरबी समुद्राच्या अथांग लाटांवर स्वार होऊन एक नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. मानसने पीरवाडी ते जेएनपीटी हे तब्बल किलोमीटरचे आव्हानात्मक अंतर पोहून पार करत सर्वांनाच थक्क केले. या अद्भूत कामगिरीबद्दल आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उरण येथील जनसंपर्क कार्यालयात मानसचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपनगराध्यक्ष रवी भोईर, सभापती जसिम गॅस, भाजप शहराध्यक्ष कौशिक शहा, तालुका शहराध्यक्ष प्रसाद भोईर, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, माजी सरपंच राजेंद्र ठाकूर, युवा शहराध्यक्ष निलेश पाटील आदी उपस्थित होते.**

# सेलिब्रिटींचे लग्न, नवे नवे विक्रम....

## झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

विक्रम हे मोडण्यासाठीच असतात आणि हा अलिखित नियम सगळ्याच क्षेत्रात, सगळ्याच बाबतीत लागू होतात, सेलिब्रिटींच्या शानदार, ग्लॅमरस लग्नाची गोष्टदेखील अशीच. त्यात तर बदलत्या माध्यमानुसार नवीन विक्रम घडत आहेत, आपण फक्त आणि फक्त त्या दृष्टिकोनातून पहायला हवे.

दिलीपकुमार आणि सायरा बानू यांचे त्या काळात फार फार गाजलेले लग्न ते विजय देवरकोडा आणि रश्मिका मंदाना यांचे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने भरभरून लाईक्स केलेले लग्न असा हा तब्बल साठ वर्षांचा प्रवास आहे.

मनोरंजन क्षेत्रातील कलाकारांच्या प्रेम प्रकरण, अफेअर (गुपचूप गुपचूप चालतं त्याला अफेअर म्हणतात. कोणी सोप्या भाषेत लफडे असेही म्हणतात), लग्न (ते धुमधडाक्यात असेल तर फार फार वाजते, गाजते), विवाहबाह्य संबंध/हितसंबंध (ते कोणी उगाच ठेवत नाहीत. त्यातही काही गणित असते, व्यवहार असतोच. मात्र धोका असतो की नाही माहित नाही), घटस्फोट (सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या गंभीर गोष्ट. आजचे बरेचसे सेलिब्रिटीज, त्याचंही सेलिब्रेशन करतात), मग एकटीने राहणे, त्याला 'सोलो ट्रॅव्हलर्स' असा आजकाल गोड शब्द वापरला जातो. प्रगती म्हणतात ती कदाचित हीच असावी. कदाचित त्याच अथवा तिचं दुसरं लग्न अथवा अगदी तिसरं लग्न अशा अनेक गोष्टींना भरपूर वाचक आणि दर्शक नक्कीच आहे. याचा चित्रपट, नाटक, मालिका, वेबसिरीज, जाहिरातपट याच्याशी दुरान्वयानेही संबंध नाही. अर्थात, अभिनयाशीही नाही. पण तरीही ते फार फार महत्त्वाचे झाले आहे.

त्यात एक फॅक्टर लग्नाचा! ते लग्न फक्त आणि फक्त त्यांच्यापुरतेच राहत नाही तर तळागाळातील चित्रपट रसिकांपर्यंत ते पोहचते. त्यांनाही अशा बातमीत विशेष रस असतोच. हा चित्रपटाच्या लोकप्रियतेचा परिणाम असावा.

लग्नापूर्वी दिलीपकुमार आणि सायरा बानू यांनी कधीही एकत्र काम केले नव्हते, म्हणून तर त्यांचे जमलं कसं याची विलक्षण उत्सुकता होती. तो मुद्रित माध्यमाचा काळ होता आणि वृत्तपत्र, साप्ताहिक, पाक्षिक यातून या लग्नाची आलेली बातमी, मग एकादा लेख वा स्फूट हे अधिकाधिक वाचकांनी वाचले. जणू एक विक्रम घडला.

राजेश खन्ना आणि डिंपल कपाडिया यांच्या लग्नाच्या ग्लॅमरस रिसेप्शनचे रिळ शक्ती सामंता दिग्दर्शित 'अनुराग' (१९७३) या चित्रपटासोबत दाखवलं जाई आणि ते पाहण्यासाठी या चित्रपटाला गर्दी होई. हा चित्रपटही मनोरंजक होता. पहिल्यांदा असे झाले की, कायमच मुद्रित माध्यमातून येणारी कलाकारांच्या लग्नाची गोष्ट थाटामाटात पडद्यावर दिसली आणि त्याला विक्रमी प्रतिसाद मिळाला. हा एक नवीन उच्चांक गाठला.

म्हटलं ना, विक्रम हे मोडण्यासाठीच






असतात. असाच एक नवीन विक्रम माधुरी दीक्षितने अमेरिकेतील डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न केले या ब्रेकिंग न्यूजला असाच भन्नाट रिस्पॉन्स मिळाला आणि आज तक या वृत्तवाहिनीने या लग्नाच्या रिसेप्शनचे 'अवघे काही मिनिटे' केलेल्या लाईव्ह कव्हरेजलाही विक्रमी टीआरपी मिळाला. आपल्या माधुरी दीक्षितचा नवरा दिसतो गं कसा याचं त्या विक्रमी टीआरपीमागे कुतूहल होते. स्टोरीत काही दम असेल तर कुतुहल वाढतं हे सोपे गणित सेलिब्रिटींच्या लग्नाच्या गोष्टीतही असते. ते पाहण्याचा दृष्टिकोन हवा.

अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांचा सुपुत्र आणि विश्व सुंदरी ऐश्वर्या रॉय यांच्या लग्नामागची 'स्टोरी' अनेक वळणे घेत घेत लग्नमंडपापर्यंत पोहचली. हाय प्रोफाईल लग्नाची गोष्ट म्हणून याची ओळख. मोठ्या लग्नाच्या गोष्टी मोठ्याच असतात आणि जुहू येथील दहाव्या रस्त्यावरील प्रतीक्षा बंगला ते जलसा बंगला असं हा लग्नसोहळा पार पडताना मीडियाचा विक्रमी प्रतिसाद मिळाला यात आश्चर्य ते काय? बरं हे सगळे कव्हरेज बाहेरचे होते. आतल्या लग्न सोहळ्यासाठी खासगी कॅमेरामन होते. ऐश्वर्या रॉय सलमान खानची होऊ ना शकली आणि अभिषेक बच्चन करिश्मा कपूरचा होवू ना शकला असा या लग्नामागचा फ्लॅशबॅक. सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील हिंदी चित्रपटात असं काहीसं घडत आणि बिघडत असे. आणखी काही वर्षांनी याच सगळ्या गोष्टीत मसाला मिक्स करून चित्रपट निर्माण होऊ शकेल. आपल्या मनोरंजन क्षेत्रातच केवढ्या तरी रंजक आणि एक्सलुझिव्ह गोष्टी आहेत, त्या पटकथा आणि संवाद लेखनात आणल्या तर रूपेरी पडद्यावर चित्रपट येईल.

विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांचे लग्न म्हणजे आपल्या देशातील चित्रपट आणि क्रिकेट यांच्या जबरदस्त क्रेझला पुरती सपोर्ट सिस्टीम. आपल्या देशातील अगदी खालच्या माणसापर्यंत पोहचलेल्या चित्रपट आणि क्रिकेटला लोकप्रियता आणि फॉलोअर्स भरपूर. दोघेही भारतीय परंपरा, संस्कृती, सभ्यता आणि मूल्ये यांची जपणूक करणारे. आपल्या दोन्ही मुलांच्या पालनपोषणात रमणारे, आपले खासगी आयुष्य जपणारे, आपल्या देशातील विविध भागांतील तीर्थक्षेत्राना आवर्जून भेटीगाठी देणारे. दोघांही आयुष्याच्या आणि कारकिर्दीच्या योग्य वयात लग्न करून आजच्या डिजिटल पिढीसमोर उत्तम आदर्श ठेवला. दोघेही आपापल्या क्षेत्रात सेलिब्रिटीज, त्यामुळे त्यांच्याभोवती तरुणाईचा गराडा जास्त. अनेक जण, अनेक जणी यांना आपल्या मोहात पाडण्याचा प्रयत्न करू शकतात अथवा यांच्याकडूनही बेसावधपणे चूक होऊ शकते, पण ते टाळण्यात ते यशस्वी. विराट कोहली मैदानावर तुफान आणि चौफेर फटकेबाजी करत असताना अनुष्का शर्माची स्टेडियमवरची



उपस्थिती कायमच लक्षवेधक. त्याची रिल सोशल मीडियात भरभरून लाईक्स मिळवणारी.

मन्सूर अली खान पतौडी आणि शर्मिला टागोर यांच्या लग्नाच्या वेळी मुद्रित माध्यमे फॉर्मात होती. त्या काळातील क्रीडाविषयक आणि चित्रपटविषयक साप्ताहिक पाक्षिक यातून या लग्नाची गोष्ट भरपूर वाचनीय ठरली. गंमत म्हणजे, कपिल शर्मा शोमध्ये एकदा शर्मिला टागोरने आपल्याला मन्सूर अली खान पतौडी यांचे हायफाय इंग्रजी कसे समजत नसे आणि ते आपल्या विनोदावर आपणच कसे हसत हे तिने सांगितले. हे सांगताना आपली मुलं आपणावर रागावणार नाहीत असाही एक विश्वास दाखवला. या गोष्टीचे रिळही भरपूर प्रमाणात लाईक्स मिळवणारे. काळ कितीही पुढे सरकू देत, सेलिब्रिटींच्या लग्नाच्या गोष्टीतील गंमत जंमत कायमच लाईक्स मिळवणारी.

'विरोश' विवाहाने हे सगळे विक्रम मोडले. विजय देवरकोडा आणि रश्मिका मंदाना यांच्या प्रेम प्रकरणापासूनच सोशल मीडियात लाईक्स वाढल्या. पॅन इंडिया चित्रपट युगात साऊथचे हे स्टार हिंदी भाषिक पट्ट्यात पोहचले आणि जगभरातील अनेक देशांमध्ये आपले चित्रपट पोहचत असल्याने हे सेलिब्रिटीही दूरवर पोहचले. सोशल मीडियाने त्यांचे चित्रपटांचे प्रगती पुस्तक, त्यातील त्यांची गीते संगीत नृत्याची बहारदार फोडणीही अधिकाधिक प्रमाणात पोहचली. हा सगळा हाईप त्यांच्या लग्नाच्या गोष्टीत सतत वाढत वाढत गेला आणि मग उदयपूर येथील लग्न सोहळा, त्याचा प्रचंड झगमगाट, त्याचं ग्लॅमर, लग्नातील संगीत, लग्नानंतर रक्ष्मिका मन्दानाच्या गावाला भेट देणं, विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देणं या सगळ्यात नुकतंच लग्न झालं त्या पतीची रश्मिका मंदानाने सतत काळजी घेणे, ते सगळे कॅमेरात येत राहणं या सगळ्यातील या नवदाम्पत्याचे आऊट फिट्स, त्यातून सतत दिसत आलेली त्यांची केमिस्ट्री, त्यांच्या रिसेप्शनला आलेले पाहुणे या सगळ्या सगळ्या गोष्टींची छोटी छोटी रिल सोशल मीडियात पोस्ट झाली आणि त्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आणि विक्रमी लाईक्स मिळवल्या. जवळपास नऊ मिलियन इतका तो आकडा आहे. अनेक देशांतून हा विक्रमी प्रतिसाद मिळाला आहे. आणि हा विक्रम घडताना लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांच्या आयनॉक्स कॅम्पेन पोस्टरच्या सोशल मीडियातील रिल लाईक्सचा विक्रम मोडला जाऊन एक नवीन उच्चांक गाठला आहे. सेलिब्रिटीजचं लग्न म्हणजे चहुबाजूंनी प्रचंड मोठी आर्थिक उलाढाल असते, त्यात हीदेखील एक रंजक गोष्ट आहे. सेलिब्रिटीजचे लग्न लावणारा भटजीही मुलाखत देताना दिसला तर त्यात अजिबात आश्चर्य नको.

चित्रपट कलाकारांच्या लग्नाची गोष्ट म्हणजे त्यांचे व्यक्तिगत अथवा खासगी आयुष्य राहिलेले नाही. तेवढेच ते वेळोवेळी अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचले आहे. प्रसार माध्यमे बदलत राहिली आणि विक्रम घडत राहिला आहे. उगाच नाही या लग्नाच्या लाईव्ह कव्हरेज प्रक्षेपणाच्या हक्काची किंमत काही कोटी रुपये द्यायची तयारी असते... सेलिब्रिटीज मॅरेज मॅनेजमेंट असा एक नवीन फंडा विकसित होणे हे कॉर्पोरेट युगाचे मोठेच देणं आहे. सेलिब्रिटीजची प्रत्येक लहान मोठी गोष्ट बातमी असते, सोशल मीडियात रिल असते आणि लाईक्सही असतात...

# रंगांच्या विश्वात हरवलेला क्षण





कला ही केवळ रंगांची किंवा रेषांची मांडणी नसते; ती कलाकाराच्या मनातील भावविश्वाची सजीव अभिव्यक्ती असते. नुकतेच भारतीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत विकास आयुक्त (हस्तकला) कार्यालयाच्या प्रयोजक तत्वाखाली सिडको अर्बन हाट सीबीडी बेलापूर येथे ६ ते १५ मार्च या कालावधीत नॅशनल गांधी शिल्प बाजार या महोत्सवाचे आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी या महोत्सवाचे उद्घाटन केले. त्यामुळे मला या महोत्सवाला जाण्याचा योग आला येथील स्टॉल क्र. ३मधील चित्रप्रदर्शनाला भेट दिली असता या प्रदर्शनात अकोल्याचे सुपुत्र, दिव्यांग चित्रकार वैभव तानाजी सांगळे यांच्या चित्रांनी मन अक्षरशः मोहित करून टाकले. त्यांच्या चित्रांमध्ये उमटलेले जिवंत भाव, रंगांची सूक्ष्म मांडणी आणि जीवनाचे वास्तवदर्शी दर्शन पाहताना मन क्षणभर त्या रंगांच्या विश्वात हरवून गेले.

जन्मतः कर्णबधीर असतानाही अथक जिद्द, चिकाटी आणि कलेवरील नितांत प्रेम यांच्या जोरावर वैभव सांगळे यांनी चित्रकलेच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रदर्शनात मांडलेली त्यांची चित्रे पाहताना प्रत्येक रंगरेषा ही त्यांच्या संघर्षमय प्रवासाची साक्ष देत असल्याची जाणीव होत होती. त्यांच्या चित्रांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर भावनांची आणि अनुभवांची एक समृद्ध दुनिया सामावलेली आहे.

वैभवचा जीवनप्रवास हा संघर्षातून उभा राहिलेल्या जिद्दीचा प्रेरणादायी अध्याय आहे. जन्मतः ऐकू आणि बोलू न शकणाऱ्या या कलाकाराने आपल्या आई-वडिलांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि स्वतःच्या कष्टाच्या जोरावर संवादाची दारे उघडली. वयाच्या चौथ्या वर्षी त्याला श्रवणयंत्र देण्यात आले आणि स्पीच थेरपीच्या माध्यमातून त्याला बोलण्याचा सराव करून घेण्यात आला. विशेष म्हणजे त्याच्या वडिलांनी स्वतः स्पीच थेरपी शिकून मुलाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावली. याच काळात त्याच्या हातात पेन्सिल आणि रंगांचा ब्रश देऊन चित्रकलेची आवड निर्माण करण्यात आली. त्या छोट्या हातांनी काढलेल्या रेषांनी पुढे एक विलक्षण कलायात्रा आकार घेतली. शालेय जीवनात अनेक अडचणी आणि टिंगलटवाळी सहन करतही वैभवने आपला आत्मविश्वास कायम ठेवला. त्याच्या वडिलांनी त्याला भाषणे लिहून दिली, लोकांसमोर उभे राहण्याचा सराव करून घेतला आणि समाजात आत्मविश्वासाने वावरण्याची ताकद दिली.

वैभवच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण आठवीत असताना घडला. कानाच्या तपासणीसाठी मुंबईला गेल्यावर त्याचे वडील त्याला सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स या प्रतिष्ठित कला संस्थेत घेऊन गेले. त्या संस्थेचे दर्शन होताच वैभवच्या मनात कलेचे स्वप्न रुजले. वडिलांनी त्याला सांगितले की, येथे प्रवेश मिळाला तर आयुष्य उजळून जाईल. त्या शब्दांनी प्रेरित होऊन त्याने त्या संस्थेत शिक्षण घेण्याचा निर्धार केला.

पुढे दहावी आणि बारावीमध्ये उत्तम यश संपादन करून चित्रकलेच्या सीईटी परीक्षेत दिव्यांग गटातून प्रथम क्रमांक मिळवत त्याने सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई येथे प्रवेश मिळवला. तेथून त्याने बीएफए (अप्लाइड आर्ट) ही पदवी संपादन केली. इंद्रायणी मतिमंद शाळेपासून ते जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सपर्यंतचा त्याचा प्रवास हा संघर्ष, जिद्द आणि स्वप्नपूर्तीचा प्रेरणादायी प्रवास आहे.

प्रदर्शनात पाहताना त्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये प्रकर्षाने जाणवत होती. पोर्ट्रेट्समधील जिवंत भाव, निसर्गचित्रांतील शांतता, ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण, वारली शैलीतील सर्जनशीलता आणि पेन्सिल पोर्ट्रेटमधील सूक्ष्म रेखाटन या सर्वांनी मनाला भुरळ घातली. प्रत्येक चित्रात कलाकाराच्या भावविश्वाची खोल जाण आणि जीवनाकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी स्पष्टपणे जाणवते.

आज वैभवच्या कलेने देशाच्या सीमा ओलांडल्या आहेत. इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जर्मनी, रशिया आणि फ्रान्स या देशांमध्ये त्याच्या चित्रांनी स्थान मिळवले आहे. मुंबईतील अमेरिकन दूतावासातही त्याच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भारत सरकारच्या 'दिव्य कला मेला' या राष्ट्रीय प्रदर्शनातही त्याने सहभाग नोंदवला असून दिल्ली, मुंबई, भोपाळ, गोहाटी, जयपूर, इंदूर, वाराणसी आणि बेंगळुरू अशा अनेक शहरांत त्याच्या कलाकृतींनी रसिकांचे लक्ष वेधले आहे. वैभव यांना नुकत्याच आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनी दिल्ली येथील विज्ञान भवनात राष्ट्रीय दिव्यांगजन या पुरस्काराने महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

वैभवच्या यशामागे त्याच्या कुटुंबाची अमूल्य साथ आहे. आई-वडिलांचे अथक प्रयत्न, भावाचे मार्गदर्शन, गुरुजनांचे आशीर्वाद आणि मित्रपरिवाराचे प्रोत्साहन यामुळेच ही यशोगाथा घडली आहे. त्याच्या नम्र स्वभावातून आणि कलेतील प्रामाणिकतेतून ही जाणीव स्पष्टपणे दिसून येते.

या प्रदर्शनातून बाहेर पडताना मनात एकच विचार घोळत राहिला-कलेला कोणत्याही मर्यादा नसतात. शरीराला मर्यादा असू शकतात, परंतु प्रतिभेला आणि स्वप्नांना सीमा नसते. वैभव सांगळे यांच्या चित्रांनी केवळ कॅनव्हास रंगवले नाहीत; त्यांनी रसिकांच्या मनातही प्रेरणेचे रंग कायमचे उमटवले आहेत. म्हणूनच ठामपणे म्हणावेसे वाटते की-या दिव्यांग चित्रकाराच्या प्रतिभेने रंगांना शब्द दिले आणि संघर्षाला सौंदर्याची एक अद्भुत अभिव्यक्ती दिली. तेव्हा आपणही सीबीडी बेलापूर येथील अर्बन हाट या भव्य प्रदर्शनाला नक्की भेट द्या.

**-संजीवनी जाधव-पाटील, सहायक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई**

# आज जागतिक ग्राहक दिन; ग्राहकांना अधिकार देणारा दिवस

आधुनिक अर्थव्यवस्थेत ग्राहक हा केंद्रबिंदू मानला जातो. बाजारपेठेत वस्तू आणि सेवा तयार करणारे उत्पादक, व्यापारी, सेवा पुरवठादार यांचे अस्तित्व ग्राहकांमुळेच टिकून असते. त्यामुळे ग्राहकांचे हित, सुरक्षा आणि अधिकार यांचे संरक्षण करणे ही शासन व समाजाची महत्त्वाची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मार्च हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश ग्राहकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे आणि बाजारपेठेत न्याय्य व्यवहार सुनिश्चित करणे हा आहे.

**ग्राहक म्हणजे काय?**

ज्या व्यक्तीने स्वतःच्या वापरासाठी किंवा उपभोगासाठी एखादी वस्तू खरेदी केली किंवा सेवा घेतली, त्या व्यक्तीला ग्राहक असे म्हणतात. भारतीय कायद्यानुसार वस्तू किंवा सेवा विकत घेणारा, त्यासाठी किंमत देणारा किंवा त्या सेवेचा लाभ घेणारा प्रत्येक नागरिक ग्राहक मानला जातो. ग्राहक हा अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठा घटक असून त्याचे संरक्षण हे कर्तव्य आहे.

**ग्राहकांचे मूलभूत अधिकार**

ग्राहक चळवळीमुळे ग्राहकांना काही मूलभूत अधिकार प्राप्त झाले आहेत. १९६२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन. एफ. केनीडी यांनी अमेरिकन काँग्रेससमोर ग्राहक हक्कांविषयी ऐतिहासिक भाषण करत चार मूलभूत अधिकार मांडले. त्यात पुढील अधिकारांचा समावेश होतो...

सुरक्षेचा अधिकार- धोकादायक वस्तू किंवा सेवांपासून संरक्षण, माहितीचा अधिकार- वस्तूची गुणवत्ता, प्रमाण, किंमत आणि दर्जा याबाबत अचूक माहिती मिळण्याचा अधिकार, निवडीचा अधिकार-विविध पर्यायांमधून वस्तू किंवा सेवा निवडण्याचा अधिकार, मते मांडण्याचा अधिकार-ग्राहकांचे मत शासन आणि धोरण प्रक्रियेत ऐकले जाणे. यानंतर संयुक्त राष्ट्रांनी १९८५मध्ये ग्राहक संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारून ग्राहक शिक्षण, तक्रार निवारण, मूलभूत गरजांची पूर्तता आणि निरोगी पर्यावरणाचा अधिकार यांसारखे अतिरिक्त अधिकारही मान्य केले.

**१५ मार्चलाच ग्राहक दिन का?**

१५ मार्च १९६२ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी ग्राहक हक्कांचा प्रश्न प्रथमच जागतिक पातळीवर मांडला. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ १९८३ पासून जगभर १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला. या दिवशी ग्राहक संघटना, शासन संस्था आणि सामाजिक संघटना ग्राहक हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात.

**ग्राहक चळवळ म्हणजे काय?**

ग्राहक चळवळ म्हणजे ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी चालवली जाणारी सामाजिक आणि कायदेशीर चळवळ. बाजारपेठेतील फसवणूक, निकृष्ट दर्जाची उत्पादने, अन्यायकारक व्यापार पद्धती आणि ग्राहकांची फसवणूक याविरोधात जनजागृती करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. जगभरातील ग्राहक संघटनांनी एकत्र येऊन ग्राहकांच्या हितासाठी विविध मोहिमा राबवल्या आणि अनेक देशांमध्ये ग्राहक संरक्षणाचे कायदे लागू झाले.

**देशातील चळवळीची सुरुवात**

भारतामध्ये ग्राहक चळवळ १९६० च्या दशकात सुरू झाली. ग्राहक संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासकांनी ग्राहक संरक्षणासाठी व्यापक जनजागृती केली. या चळवळीचा सर्वात मोठा टप्पा म्हणजे ग्राहक संरक्षण कायदा १९८६ हा कायदा. या कायद्यामुळे ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ग्राहक न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली. यानंतर बदलत्या बाजारपेठेच्या गरजेनुसार भारत सरकारने ग्राहक संरक्षण कायदा लागू केला. या कायद्यामुळे ई-कॉमर्स व्यवहार, भ्रामक जाहिराती आणि ऑनलाईन व्यापार यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन तरतुदी करण्यात आल्या. ऑनलाईन वस्तू मागवली पण वस्तू मिळाली नाही, चुकीची वा निकृष्ट वस्तू मिळाली.

पैसे घेतले पण सेवा दिली नाही, भ्रामक ऑनलाईन जाहिरात करून ग्राहक फसवला, ई-कॉमर्स कंपनीने रिफंड दिला नाही, आदी सर्व तक्रारी ग्राहक संरक्षण कायदा अंतर्गत करता येतात. तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी त्रिस्तरीय ग्राहक आयोग व्यवस्था कार्यरत करण्यात आली आहे.

**भारतातील ग्राहक दिन**

जागतिक पातळीवर १५ मार्च हा ग्राहक दिन आहे. तर भारतामध्ये २४ डिसेंबर हा 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणून साजरा केला जातो. कारण २४ डिसेंबर १९८६ रोजी ग्राहक संरक्षण कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली. या दिवशी ग्राहक हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात.

महाराष्ट्रातील ग्राहक चळवळ उभारण्यात प्रामुख्याने बिंदू माधव जोशी, स्वातीताई शहाणे, बापूसाहेब महाशब्दे यांच्यासह विविध संघटनांनी योगदान दिले. त्यांनी ग्राहक हक्कांसाठी विविध संघटना उभारून जनजागृती, कायदेशीर लढाया आणि संशोधनकार्य केले.

**महाराष्ट्र शासनाची भूमिका**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा हे एक मंत्रालय निर्माण केले आहे .त्या अंतर्गत ग्राहक संरक्षणासाठी स्वतंत्र ग्राहक संरक्षण विभाग, राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, राज्य व जिल्हा ग्राहक आयोग, (जिल्हा ग्राहक न्यायालय) राज्य ग्राहक आयोग, आणि ग्राहक संघटनांनी ग्राहक मार्गदर्शन केंद्रे सुरू केली आहेत. जिल्हा ग्राहक न्यायालयाच्या मार्फत राज्यात ग्राहक जनजागृतीसाठी ग्राहक तक्रार निवारण केंद्रे, तसेच शालेय-महाविद्यालयीन स्तरावर ग्राहक शिक्षण कार्यक्रम राबवले जातात. ५० लाखांपर्यंतच्या फसवणुकीसाठी जिल्हास्तरावरचं ग्राहकांना याचिका दाखल करता येते आणि जिल्हा ग्राहक न्यायालयाकडून या संदर्भात न्याय दिला जाते. याशिवाय ५० लाख ते दोन कोटी पर्यंत राज्य व त्या पुढच्या रकमेसाठी केंद्रीय जिल्हा ग्राहक आयोगात खटला चालवला जाऊ शकतो. जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हास्तरावर ग्राहकांच्या संदर्भातील अनेक समित्यांचे सदस्य सचिव म्हणून काम बघतात. त्यांच्यामार्फत ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठका आयोजित केल्या जातात. त्यामुळे सध्या बाजारातील हालचाली बघता जागतिक ग्राहक दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून ग्राहक सक्षमीकरणाचा संदेश देणारा दिवस आहे. बाजारपेठेतील अन्यायकारक पद्धतींना आळा घालण्यासाठी ग्राहक जागरूक असणे आवश्यक आहे. शासन, ग्राहक संघटना आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच ग्राहकांचे हित सुरक्षित राहू शकते. म्हणूनच १५ मार्चचा दिवस आपल्याला ग्राहक म्हणून आपल्या अधिकारांची जाणीव करून देतो आणि न्याय्य व पारदर्शक बाजारपेठ निर्माण करण्यासाठी प्रेरणा देतो.

**-प्रवीण टाके, उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर भरण्याची सुविधा

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू असून चालू आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिल्यामुळे नागरिकांना कर भरणे सोयीचे व्हावे यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार ३१ मार्च २०२६ पर्यंत शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही महापालिकेचे मुख्यालय आणि आठही विभाग कार्यालयांतील कर संकलन केंद्रे सुरू ठेवण्यात येणार आहेत.



सुट्टीच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कर भरण्याची सुविधा उपलब्ध असेल, तर कामकाजाच्या दिवशी कर संकलन केंद्रे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहतील. चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर भरण्यासाठी अवघे १८ दिवस शिल्लक असल्यामुळे नोकरदार वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरणे शक्य व्हावे, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.

१९ मार्च रोजी गुढीपाडवा, २१ मार्च रोजी रमजान ईद, २६ मार्च रोजी श्रीराम नवमी आणि ३१ मार्च रोजी महावीर जयंती या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही कर संकलन केंद्रे नागरिकांसाठी खुली राहणार आहेत.शहरातील मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी प्रत्यक्ष कर संकलन केंद्रांबरोबरच विविध ऑनलाइन सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

'माय एनएमएमसी – माझी नवी मुंबई' मोबाइल ॲप, महापालिकेची अधिकृत संकेतस्थळ, व्हॉट्सॲप चॅटबॉट (८२९१९२०५०४), कर देयकांवरील क्यूआर कोड स्कॅनिंग तसेच विविध यूपीआय ॲप्सद्वारे मालमत्ता कर भरता येणार आहे. याशिवाय डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, आरटीजीएस आणि एनईएफटी या डिजिटल पर्यायांचाही वापर करता येणार आहे.

### अभय योजनेत विलंब शुल्कावर ५० टक्के सवलत

महापालिकेमार्फत सुरू असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठीही आता मर्यादित कालावधी शिल्लक आहे. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता कर ३१ मार्च २०२६ पर्यंत एकरकमी भरल्यास विलंब शुल्कावर ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे थकबाकीदार मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेऊन कर भरावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# पामबीच मार्ग सिंगलवर अजस्त्र लोखंडी सांगाडा

## आमदार मंदा म्हात्रे यांचा पाहणी दौरा

नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार

नवी मुंबई पामबीच मार्गावरील सर्व सिग्नल यंत्रणा अत्याधुनिक करण्याच्या सबबीखाली रस्त्याच्या मधोमध ६८ सिग्नल ठिकाणी अवाढव्य अनधिकृतपणे डिजिटल जाहिरातींचे फलक लावण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास येताच स्थानिक आमदार मंदा म्हात्रे आज करावे येथील टी. एस. चाणक्य चौकामध्ये स्थानिक ग्रामस्थ सोबत पाहणी दौरा केला.

पाहणी दौऱ्यादरम्यान बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, करावे गावातील टी. एस. चाणक्य चौक येथील सिग्नलच्या रस्त्याच्या मधोमध अजस्त्र लोखंडी सांगाडा उभारल्याचे निदर्शनास आले. सांगाड्यावर डिजिटल जाहिराती करण्यापूर्वी महाराष्ट्र सागरी किनारा नियामक प्राधिकरण, पर्यावरण विभाग, नवी मुंबई वाहतूक पोलीस यांची परवानगी आवश्यक ठरत असते. रस्त्याच्या मधोमध वाहन चालकांचे लक्ष विचलित होईल अशा पद्धतीने जाहिराती करणे हे धोक्याचे ठरू शकतं. वाहन चालकाचे लक्ष विचलित होईल अशा ठिकाणी चलचित्र जाहिराती इलेक्ट्रॉनिक फलकाद्वारे प्रदर्शिक करणे हे नियमबाह्य आहे. त्यामुळे वाहन चालकाचे लक्ष विचलित होऊन अपघात होण्याची भीती त्यांनी बोलताना व्यक्त केली.



याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी १२ मार्च २०२६ रोजी सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी मार्फत शासनाचे लक्ष वेधले होत. लक्षवेधी वरील उत्तरात मंत्री माधुरी मिसाळ यांनी येत्या आठ दिवसांत कारवाई करण्याचे सांगितले होते .

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेवक राजू शिंदे, प्रवीण भगत, मिलिंद भोईर, जयवंत तांडेल, पुण्यनाथ तांडेल, योगेश तांडेल, प्रकाश मुकादम, मनोज म्हात्रे, सुहासिनी नायडू आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# बहुजनांपुढील आव्हान विषयावर आज घटनातज्ज्ञांकडून मार्गदर्शन

नवी मुंबई : प्रतिनिधी

बामसेफचे संस्थापक मा. कांशीराम यांची ९२वी जयंती रविवार, १५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता सानपाडा सेक्टर १० येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष

घटनातज्ञ ॲड.डॉ. सुरेश माने यांचे आधुनिक भारतात बहुजनां पुढील आव्हान या विषयावर प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष ॲड. प्रदिप ढोबळे, ॲड दिनेश राजभर आदी मान्यवरांची भाषण होणार आहेत. कांशीराम यांच्या जयंती दिनी मोठ्या संख्येने बहुजनांनी उपस्थित रहावे, असे आवाहन बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष ॲड. नवीन प्रतापे यांनी केले आहे.

# घरगुती गॅस सिलिंडर पुरेशा प्रमाणात उपलब्ध

## साठा करून न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

नवी मुंबई : बातमीदार

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला औद्योगिक व व्यावसायिक गॅसचा तुटवडा तात्पुरता असून डोमेस्टिक अर्थात घरगुती गॅस सिलेंडर पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत याची नागरिकांनी नोंद घ्यावी. यामुळे नागरिकांनी अस्वस्थ होऊन घाबरून न जाता गॅस सिलेंडरचा साठा करून ठेवू नये, असे सूचित करण्यात येत आहे.

डोमेस्टिक घरगुती वापरासाठीचा गॅस पुरवठा सुरळीत राखण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जात असून रुग्णालरुग्णालयातील रुग्णांसाठीचे व शालेय पोषण आहारासाठीचे जेवण बनवण्यासाठीही गॅस पुरवठा सुरळीत राहील याकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे. नागरिकांनी गॅस सिलेंडरचा पुरवठा करून ठेवू नये व कोणत्याही अफवांना बळी पडू नये आणि अधिकृत विश्वासार्ह माहितीवरच विश्वास ठेवावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

याबाबत काही अडचण भासल्यास नवी मुंबई महानगरपालिकेच्या १८००२२२३०९ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा तसेच याकडे ठाणे जिल्हास्तरीय शिधावाटप कार्यालयाकडूनही बारकाईने लक्ष देण्यात येत असून जिल्हा शिधावाटप कार्यालयातील अधिकारी प्रशांत काळे (संपर्क ध्वनी – ९१५८८८३६४४) अथवा नवी मुंबई शिधावाटप कार्यालयातील अधिकारी छाया पालवे (संपर्कध्वनी – ९९६७९१३८९१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# तुराडे आणि बारवई ग्रामपंचायत सरपंचांचा सन्मान

मोहोपाडा : प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद अलिबाग पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने स्वच्छतेच्या बाबतीत कॉफी विथ विनर कार्यक्रम या कार्यक्रमा अंतर्गत स्वच्छता सर्वेक्षण होऊन जागतिक महिला दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला सरपंच व महिला कर्मचारी यांचे सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी रसायनीतील तुराडे ग्रामपंचायत सरपंच रंजना गायकवाड व कर्मचारी भारती गायकवाड यांचा सत्कार अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा




प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा कार्यकारी अधिकारी नेहा भोसले मॅडम उपस्थित होत्या. तर बारवई ग्रामपंचायत सरपंच नियती बाबरे यांनाही सन्मान पत्र मिळाले आहे.

# पनवेलमध्ये मंगळवारी रोजगार मेळावा

पनवेल : रामप्रहर वृत्त

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग व महाराष्ट्र भूषण डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने १७ मार्च रोजी महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल, जुना मुंबई–पुणे हायवे, गांधी हॉस्पिटलसमोर, बसस्थानकाजवळ, ता.पनवेल येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबागच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नामांकीत आस्थापनांकडील रिक्तपदांच्या / प्रेंटिसशिपची भरतीसाठी रोजगार




मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात एस.एस.सी./एच.एस.सी,आय.टी.आय.,डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, व इतर पदवीधारक नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दीतीने अर्ज करता येईल. प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Employment- Job Seeker (Find - Job)- Job Seeker डेसळप याक्रमाने जाऊन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listingal Agree व दिसणाऱ्या विविध पदाना आपल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या नवउद्योजकांकरिता महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कर्ज योजनां विषयाची माहिती दिली जाईल, जेणेकरून स्वयंरोजगार करणाऱ्या इच्छूक उमेदवारांना योजनेचा लाभ मिळू शकेल. तसेच रोजगार मेळाव्यातील रिक्तपदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०२९ व या कार्यालयाचे लिपिक टंकलेखक म.भा. वखरे,यांच्या ९४२१६१३७५७ या भ्रमध्वनी वर संपर्क साधावा.



# हिरकणी पुरस्कार देऊन महिलांचा गुणगौरव

नवी मुंबई : प्रतिनिधी

नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या विद्यमाने जागतिक महिला दिन १२ मार्च २०२६ रोजी, संघाच्या नेरूळ येथील गणेश सभागृहात उत्साहाने साजरा करण्यात आला.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या एकूण आठ कर्तबगार महिलांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर वंदना शिंदे, वृषाली मगदूम, नगरसेविका नेत्रा शिर्के, माधुरी सुतार, स्वप्ना गावडे, संघाचे अध्यक्ष विकास साठे, पोलीस अधिकारी माधुरी पाटील आदी उपस्थित होते.

शालिनी इंगळे, रुचिता कर्पे, कल्पना गायकवाड, भारती बिरामणे, सुरेखा शिवशरण, पाकीजा अत्तार, स्नेहल नाईक, भावना काळे व छोटी हिरकणी कुमारी उल्का सावंत आदी समाजात विविध स्तरावर उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा महापौरांच्या हस्ते हिरकणी पुरस्कार – २०२६ देऊन सन्मान करण्यात आला.

अजय माढेकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले.

# स्वच्छ अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचा सन्मान

मोहोपाडा : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून या अभियानामुळे अनेक ग्रामपंचायतीना संत गाडगेबाबा ग्रामस्वचछता अभियानात मानांकन मिळाले आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी खालापूर तालुक्यातील स्वच्छतेत उत्कृष्ट काम करणाऱ्या दोन महिला सरपंच व तालुक्यातील दोन महिला स्वच्छता कर्मचारी यांच्यासाठी कॉफी वूईथ विनर कार्यक्रम रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे ११ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास




यंत्रणा प्रियदर्शिनी मोरे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले.

या समारंभात खालापूर तालुक्यातून स्वचछतेत उत्कृष्ट काम करणाऱ्या वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच उमाताई संदिप मुंढे व माजगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच दिपाली नरेश पाटील तसेच वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या सफाई कामगार तारा चिंतामण खारकर, सुनिता अनंत घाटे या दोन महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना अलिबाग येथे जिल्हा परिषद विभागातून सन्मानित करण्यात आले. स्वच्छ अभियानात

सरपंच उमा संदिप मुंढे, सरपंच दिपाली नरेश पाटील व दोन सफाई महिला कर्मचाऱ्यांना सन्मानित केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रणरणत्या उन्हात थंडगार रानमेव्याची भुरळ



मोहोपाडा : प्रतिनिधी

उन्हाळ्याचे आगमन होताच हा रानातील रानमेवा बाजारात आल्याने यामध्ये करवंदे, कैरी, अंजीर, काजू, चिंच आदी जंगलामध्ये तयार झालेला रानमेवा बाजारात दाखल झाले आहे. या रानमेव्यामुळे आदिवासी या समाज्याला रोजगार मिळत असतो.तसेच रानातील काळी मैना अजून तयार झाली. नसून हिरवीगार करवंदे म्हणून हिचा ठेचा म्हणून स्वयंपाक करण्यासाठी दैनंदिन जीवनात वापरत उपयोग होत आल्याचे महिला वर्गाकडून सांगण्यात येत आहे.

रुचकर, स्वस्त आणि औषधी असे बहुउपयोगी असलेल्या या रानमेव्याची अनेकांनी भुरळ पडत आहे. दुर्गम भागात राहणारे अदिवासीं बांधवांचे उत्पन्नाचे साधन म्हणून डोंगरातील रानमेवा असून उन्हाळ्याच्या दिवसामध्ये पटकन तोंडात टाकता येणारा तसेच शरीराला आणि मनाला गारवा देणाऱ्या या रानमेव्याला अधिक मागणी दिसत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसामध्ये शरीराला थंडावा निर्माण होण्यासाठी फलाहार केला जातो. बाजारपेठेमध्ये आंबा, द्राक्षे, फणस, चिक्कू यासारख्या फळांचा बरोबरच करवंद, काजुफळ, तोरणे, यासारख्या रानमेव्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. असह्य करणार्या उन्हामध्ये अगदी पटकन तोंडात टाकता येणार्या आणि खायला रुचकर असणाऱ्या या रानमेव्यांना लहान मुलांपासून मोठ्या मंडळी सर्वांचीच मागणी असते. शरीराला थंडावा देणारा आणि औषधी गुणधर्म असणारा रानमेवा अगदी आवडीने खाताना दिसतात.

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत खरेदीदार आणि विक्रेता संमेलन

नवी मुंबई : प्रतिनिधी

शेतकरी उत्पादक कंपन्या आणि संस्थात्मक खरेदीदार यांच्यात थेट बाजारजोडणी निर्माण करण्याच्या उद्देशाने स्मार्ट प्रकल्पांतर्गत खरेदीदार–विक्रेता संमेलनाचे आयोजन बुधवारी कोपरखैरणे येथे करण्यात आले होते. या मेळाव्यात मूल्यसाखळी विकास, करारशेती आणि कृषी उत्पादनांच्या बाजारपेठ विस्ताराच्या संधी यांवर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमात स्मार्ट प्रकल्पाच्या ठाणे विभागीय अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी भीमाशंकर पाटील यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी बाजारपेठेशी मजबूत जोड निर्माण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. लघु व सीमांत शेतकऱ्यांना स्पर्धात्मक मूल्यसाखळीचा लाभ मिळवून देण्यासाठी 'प्रोडक्टिव्ह पार्टनरशिप' या संकल्पनेवर प्रकल्पात विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमांतर्गत पॅलेडियम कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि. ही संस्था तांत्रिक सहाय्यक म्हणून



कार्यरत असून बाजारजोडणी, बँकांशी दुवे निर्माण करणे, क्षमता विकास प्रशिक्षण तसेच अन्नसुरक्षा व गुणवत्ता मानकांबाबत मार्गदर्शन केले जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

पॅलेडियम कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि.चे टीम लीडर राम मोहिते यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या विकासात महिलांचा सहभाग वाढविण्याची गरज व्यक्त केली. शेतकऱ्यांनी केवळ एका पिकावर अवलंबून न राहता विविध पिके तसेच प्रक्रिया उत्पादने यांचा समावेश करून कृषी व्यवसायाचे विविधीकरण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी विपणन तज्ज्ञ अनिकेत यादव यांनी हंगामाबाहेरील काळात प्रक्रिया उद्योग किंवा लघुउद्योग सुरू केल्यास शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळू शकते, असे सांगितले. खरेदीदारांनी आवश्यक उत्पादनाचे प्रमाण स्पष्ट करणे आणि विक्रेते–खरेदीदार यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण होणे व्यवसाय वृद्धीसाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

खरेदीदारांच्या वतीने केपी एक्स्पोर्ट्सचे प्रकाश कक्कड यांनी करारशेती आणि थेट खरेदीची संकल्पना स्पष्ट करत भेंडी, मिरची आणि डाळिंब यांसारख्या पिकांची थेट शेतकऱ्यांकडून खरेदी केली जात असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी गुणवत्तापूर्ण उत्पादनावर लक्ष केंद्रित करावे, तर बाजारपेठ आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे रत्नागिरी विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. मिलिंद जोशी यांनी 'मॅग्नेट' प्रकल्प आणि भौगोलिक निर्देशांक (जीआय) मानांकनामुळे कृषी उत्पादनांना अधिक मूल्य मिळू शकते, असे सांगितले. कोकणातील आंबा, काजू, फणस, मसाले, तांदूळ आणि मत्स्य उत्पादने यांसारख्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत वेगळी ओळख मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्यात शेतकरी उत्पादक कंपन्या आणि खरेदीदार यांच्यात थेट संवाद साधण्यात आला. संभाव्य बाजारपेठ, मूल्यवर्धन आणि दीर्घकालीन व्यावसायिक भागीदारीच्या संधींबाबत चर्चा करण्यात आली. अशा उपक्रमांमुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांना थेट बाजारपेठ मिळण्यास मदत होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास हातभार लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वाघमोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती निखाडे यांनी केले. कार्यक्रमास विभागीय अंमलबजावणी कक्ष तसेच पॅलेडियम कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि. ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# वीर वाजेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन व्याख्यान

उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने करिअर गायडन्स विषयक विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून सोसायटी ऑफ पेरेंट्स ऑफ चिल्ड्रन विथ ऑटिस्टिक डिसऑर्डर (सोपान) या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या सुविधा कॉलेज ऑफ स्पेशल एज्युकेशन येथील सहायक प्राध्यापक सुनंदा चक्रबोर्ती यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

चक्रबोर्ती यांनी सोपान संस्थेची उद्दिष्टे, विशेष मुलांसाठी राबविले जाणारे शैक्षणिक उपक्रम तसेच सुविधाद्वारे चालविल्या जाणाऱ्या पूर्णवेळ व अर्धवेळ कोर्सेसची माहिती सविस्तर दिली. त्यांनी ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर असलेल्या मुलांची मुख्य लक्षणे, त्यांची शैक्षणिक व भावनिक गरज, तसेच अशा मुलांसाठी प्रशिक्षित विशेष शिक्षकांची गरज अधोरेखित केली आणि समाजात ऑटिझमबाबत योग्य जागरूकता निर्माण होणे आवश्यक असल्याचे नमूद केले.या कार्यक्रमात महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी तृप्ती म्हात्रे– कडू यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विशेष शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रत्यक्ष अनुभव, या क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि आवश्यक कौशल्ये याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते.

# आरसीएफचा एनपीके प्रकल्प प्रगतिपथावर

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशाची खत मागणीची गरज ओळखून राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) थळ प्रकल्पात औद्योगिक विस्तारासाठी महत्त्वाचे प्रकल्प हाती घेत आहे. यामध्ये नवीन एनपीके खत प्रकल्प उभारणीचे काम प्रगतिपथावर असून मार्च २०२७पर्यंत कार्यान्वित होण्याची आशा आहे. या प्रकल्पामुळे देशातील संमिश्र खतांच्या उत्पादन क्षमतेत मोठी वाढ होणार असल्याने भारताचे आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पुढचे पाऊल ठरणार आहे, अशी माहिती आरसीएफ व्यवस्थापनातर्फे देण्यात आली.

ऊर्जा कार्यक्षमतेसाठी आरसीएफकडून विविध ऊर्जा बचत प्रकल्प राबविण्यात येत असून त्याद्वारे युरिया व अमोनिया प्रकल्पांमध्ये ऊर्जा वापर कमी होणार आहे. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेची शाश्वतता व कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल. या औद्योगिक प्रकल्पांमुळे स्थानिक पूरक उद्योगांना चालना, प्रादेशिक आर्थिक विकास आणि देशाच्या कृषी क्षेत्राला बळकटी मिळणार आहे.




आरसीएफकडून रायगड जिल्ह्यातील स्थानिक नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी आणि औद्योगिक प्रगतीला गती देण्यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्याचा मनोदय आहे. स्थानिक प्रशासन, जनता जनार्दन, विविध संस्था आणि सामाजिक संघटनांच्या सहकार्याने अलिबाग व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आरसीएफ कटिबद्ध असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

आरसीएफ ही भारत सरकारची सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य पहिली नवरत्न दर्जा प्राप्त कंपनी असून रायगड जिल्ह्यात औद्योगिक विकासासोबत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करत आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रम अंतर्गत सामाजिक जबाबदारी म्हणून सीएसआर धोरणानुसार कंपनीने विशेषतः आपल्या आसपासच्या क्षेत्रामध्ये आरोग्यसेवा, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, शिक्षण, परिसरातील रस्त्यांचे बांधकाम, मोबाईल मेडिकल व्हॅन सेवा, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रांना सहाय्य, सौर ऊर्जा प्रकल्प, स्वच्छता उपक्रम, अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, आदिवासी कबड्डी स्पर्धांचे आयोजन करून क्रीडा प्रोत्साहन, शाळा व सार्वजनिक संस्थांना डिजिटल व पायाभूत सुविधा सहाय्य, गरजू व वंचित मुलांना पौष्टिक अन्नधान्याचे वितरण, वृद्धाश्रमांना आर्थिक सहाय्य व ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी मदत तसेच शेतकऱ्यांना रोपे व बियाण्यांचे वितरण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा इत्यादी उपक्रम सामाजिक विकासाला चालना देत जे गरजू व सर्वसाधारणपणे समाजाच्या हितासाठी उपयोगी असे विविध उपक्रम राबविले आहेत.

आरसीएफच्या स्थापनेपासून आजपर्यंत सामाजिक बांधिलकी व ग्रामीण क्षेत्राच्या विकासाबरोबर एक मजबूत व्यावसायिक उद्देश समोर ठेवून कार्यनीति, समर्पण, अध्यावत नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान केवळ व्यावसायिक यशच नाही, तर राष्ट्रीय प्रगतीदेखील कशी साधू शकतो हे पहिले आहे. आपण बनवलेले प्रत्येक उत्पादन आणि आम्ही विकसित केलेले प्रत्येक उपाय, आत्मनिर्भर आणि शक्तिशाली कृषी भारतामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे, अशीही माहिती देण्यात आली.

## विविध सामाजिक उपक्रमांवरही भर

***आरसीएफने विविध उपक्रमांवर सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात सुमारे सात कोटी २५ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च केला आहे तसेच सन २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या कालावधीत सुमारे १० कोटी ५० लाख खर्च करून नियमित उपक्रमांबरोबरच विशेषत: थळ व नवगाव मच्छीमार महिलांना आईस बॉक्स वितरण, रुग्णालयांना वैद्यकीय उपकरणे, आरोग्य तपासणी शिबिरे तसेच महिला व दिव्यांग व्यक्तींसाठी सक्षमीकरण कार्यक्रम यांचा समावेश करून कंपनीने या उपक्रमांमुळे अलिबाग परिसरातील गावांमध्ये आरोग्य, शिक्षण, कृषी, स्वच्छता व ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासास मोठी चालना देण्याचे उल्लेखनीय काम केले आहे, असे व्यवस्थापनाने सांगितले.***

## बेकायदेशीर माती उत्खनन प्रकरणात चौघांवर गुन्हा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील मौजे कुली येथे शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररीत्या माती उत्खनन केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात अंदाजे ६५ लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपींनी त्यांच्या ताब्यातील जेसीबी व डंपरच्या सहाय्याने शासनाची कोणतीही परवानगी न घेता माती उत्खनन करून चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच या कृत्यामुळे पर्यावरण संरक्षण अधिनियमाचे उल्लंघन करत सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केल्याचा आरोप आहे. ही घटना ७ मार्च रोजी पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास मौजे कुली येथील शेतजमीन मालक विष्णू भीमराव पडवळ यांच्या गट क्रमांक १०२६ येथे घडली.

या प्रकरणी महसूल विभागातील कर्मचारी दीपक बाबुसिंग राठोड (वय ४९, रा. भुनेश्वर, ता. रोहा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अबू समा शफीकुल आलम (वय २८), एम. डी. बशीर जियाहुल हक्क (वय २४), याकूब अली हबीबुल रहमान (वय १९) आणि संजय कुमार गोविंद (वय २०) या चार आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

घटनास्थळावरून पोलिसांनी एमएच ४६/सीएल ७६८७ क्रमांकाचा मातीने भरलेला दहा टायरचा डंपर, अंदाजे पाच ब्रास माती (प्रती ब्रास ३०० रुपयेप्रमाणे), तसेच एमएच ०५/एफजे ७८८७ क्रमांकाचा दुसरा डंपर आणि जेसीबी (सिरीयल नंबर ००४९४६७८) असा एकूण ६५ लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी आरोपींना भारतीय नोटीस देऊन अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास कोलाड पोलीस करीत आहेत.

## रेल्वे प्रकल्पाच्या कामात अडथळा; पाच जणांवर गुन्हा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील किरवली परिसरात सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्पाच्या कामात अडथळा निर्माण करून दहा डंपर गाड्यांचे काम देण्याची मागणी तसेच दोन लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी पाच जणांविरोधात कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्या पाचही जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी प्रदीप प्रकाश विश्वास (वय २६) यांनी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार २६ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास काही जण कामाच्या ठिकाणी आले. त्यांनी 'तुम्ही बाहेरचे येऊन आमच्या गावात काम करता, त्यामुळे आम्हाला दहा डंपर गाड्यांचे काम द्यावे' अशी मागणी केली तसेच कामगारांना शिवीगाळ करून काम बंद पाडण्याची धमकी दिली. त्यानंतर ३ मार्च रोजी पुन्हा दोन लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास काम बंद पाडू आणि मारहाण करू, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी विशाल गायकवाड, विनोद बडेकर, प्रितेश उर्फ बाबू भोईर, मयूर गायकवाड आणि अविनाश बडेकर सर्व रा. किरवली यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## रेवदंड्यात कार्यकुशल महिलांचा सत्कार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे निमित्ताने रेवदंडयामध्ये महिला दिन मोठया उत्साहात साजरा झाला. या निमित्त कार्यकुशल महिलांच्या सत्कार, फॅशन शो व ऑकेस्ट्राची धूम यामुळे दिमाखदार कार्यक्रम वेगळीच छाप पाडून गेला.



रेवदंडयातील व्यापारी अमित म्हात्रे यांचे संकल्पनेतून जागतिक महिला दिनाचे निमित्ताने को.ए.सो.हायस्कुलच्या प्रांगणात पल्लवी म्हात्रे यांनी महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास नवनिर्वाचित जि.प.सदस्य सचिन राउळ, पं.स.सदस्य शरद गोंधळी, सरपंच प्रफुल्ल मोरे, माजी जि.प.सदस्य बाळाशेठ तेलंगे, प्रसाद गोंधळी, भारती मोरे, शलाका राउत, माजी जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, चौल माजी सरपंच रूपाली म्हात्रे, रेवदंडा ग्रा.प. माजी सरपंच सोनाली मोरे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

यावेळी माजी सरपंच व माजी पं.स. सदस्य सरोज वरसोलकर, भाजी विक्रेत्या नुरजॅहा हुसेन बुऱ्हान, हर्षदा धुमाळ, रिया झावरे, चौल येथील अश्विनी राउत, रेखा घरत या कार्यकुशल महिलांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करून करण्यात आले.

कला व संस्कृतीचा संगम पेश करताना ११ प्रसिध्द मॉडेल्सचा पारंपरिक मराठमोळा फॅशन शो, मराठी वेशभुषा तसेच कलाधारा ज्वेलरीतर्फे दागिन्यांची सजावट, कॉस्टयुम डिझायनर लक्ष्मी मुकादम यांनी केले प्रितम सुतार यांच्या

## कर्जत रेल्वेस्थानकाच्या आरक्षण खिडकीवर डेबिट कार्डची सुविधा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकात तिकीट आरक्षण खिडकीवर बंद असलेली डेबिट कार्डची सुविधा सुरू करा, अशी मागणी कर्जतकर प्रवाशांची होती. सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली असता ही सुविधा सुरु झाली आहे. त्यामुळे प्रवाशांचा या बाबतीत त्रास होणार नाही.

हल्ली डिजीटलच्या युगात बहुतांश नागरिक डिजिटल पेमेंट करतात, परंतु कर्जत रेल्वे स्थानकात आरक्षण खिडकीवर डेबिट कार्डच्या पेमेंटची व्यवस्था बंद असल्याने कर्जतकर प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. या बाबतीत कर्जत येथील सतीश पिंपरे यांनी कर्जत येथे आरक्षण खिडकीवर डेबिट कार्डने पैसे देण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांच्या निदर्शनास आणली असता ओसवाल यांनी त्वरित या बाबतीत रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली. सदर डेबिट कार्डची व्यवस्था का बंद आहे? अशी विचारणा केली. याचे स्पष्टीकरण मागितले होते.

आरक्षण तिकीट काढण्यासाठी डेबिट कार्डची व्यवस्था कोणत्या तारखेपर्यंत सुरू करणार आहात? याची विचारणा केली होती. या बाबतीत ही सुविधा स्टेट बँक ऑफ इंडिया देत असल्याकारणाने रेल्वे प्रशासनाने याबाबतीत स्टेट बँक ऑफ इंडियाकडे हे प्रकरण पाठविले होते.

ओसवाल यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया कडे संपर्क करून अडचणीची माहिती घेऊन ती अडचण दूर करून आता ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबद्दल प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

## सुधागडात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान





**पाली : प्रतिनिधी**

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय येथे जागतिक महिला दिनानिमित्ताने भारतीय जनता पक्ष सुधागड महिला मोर्चा आयोजित क्रिडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान आणि महिला सुरक्षासंदर्भात मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून पेण नगराध्यक्ष प्रितम पाटील तसेच भाजप नेत्या गीता पालरेचा, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा प्रणाली शेठ, माजी सरपंच कानडे, संजना फाळे, आरती भातखंडे, समृद्धी बारस्कर यांची गायकवाड, चैत्राली भोईर उपस्थित होत्या.

ज.नौ. पालीवाला महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग, ग. बा. वडेर हायस्कूल, व.ग. ओसवाल ज्युनिअर कॉलेज चे प्राचार्य भाऊसाहेब घोडके, उपप्राचार्य पोटे व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते..

यावेळी राज्यस्तरीय विविध खेळात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यात अ‍ॅथलेटिक्स मध्ये सविता कोकरे, खो-खो साक्षी खैरे, कबड्डीपटू भारती ढेबे यांचा सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा. विशाखा मानकामे यांनी केले व आभार भाजप महिला मोर्चा सुधागड तालुका अध्यक्ष प्रणाली शेठ यांनी केले. सदर वेळी नाजूका गुरव व अ‍ॅड. आरती गुप्ता यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

## पोलीस मित्र संघटनेच्या विधानसभा संपर्कप्रमुखपदी अ‍ॅड. संतोष कोळंबे

**खोपोली : प्रतिनिधी**

पोलीस मित्र संघटना संघटनेच्या कर्जत खालापूर विधानसभा क्षेत्र अध्यक्षपदी ज्येष्ठ वकील व सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. संतोष कोळंबे यांची निवड करण्यात आली.



अ‍ॅड. संतोष कोळंबे खोपोली शहरातील नामवंत वकील असून सामाजिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य त्याप्रमाणे दांडगा जनसंपर्क या पार्श्वभूमीवर संघटनेने कोळंबे यांची या पदासाठी निवड केली. अलीकडेच कोळंबे यांच्या कार्यालयात संघटनेचे अध्यक्ष संतोष चौधरी व प्रदेश अध्यक्ष डॉ सुनील पाटील यांनी नियुक्तीपत्रासह शुभेच्छा दिल्या.

संघटनेने दाखवलेल्या विश्वासाला आपण पात्र ठरवू व याहूनही सर्वसामान्यांसाठी आपले कार्य प्रभावीपणे करणार असल्याचे अ‍ॅड संतोष कोळंबे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## अ‍ॅड. राजेंद्र मोरे यांच्या नूतन कार्यालयाचे उद्‌घाटन

**चौक : प्रतिनिधी**

अ‍ॅड. राजेंद्र गोपाळ मोरे यांच्या ट्रूथ अँड रियालिटी या नवीन कार्यालयाचे उद्‌घाटन भारतीय जनता पक्षाचे नेते अतथा माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे व उद्योगपती नितीन देशमुख यांच्या हस्ते झाले.

अ‍ॅड. राजेंद्र गोपाळ मोरे हे खालापूर तालुक्यातील प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ आहेत. चौक येथे त्यांनी नव्याने कार्यालय सुरू केले असून त्याचे उद्‌घाटन भाजप नेते मोतीराम ठोंबरे व उद्योगपती नितीन देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी हभप भिकाजीमहाराज कदम, उद्योगपती गौतम सचदेव, भारतीय जनता पक्षाचे अभिजित देशमुख, माजी सरपंच व भाजप नेते सचिन मते, गिरीश जोशी, प्रफुल्ल विचारे, श्याम साळवी, राजेंद्र येरूनकर, सुहास कदम, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी अ‍ॅड. मोरे यांना शुभेच्छा दिल्या.



# माणगावच्या अपेक्षा शेट्टीचा जम्मू ते कन्याकुमारी बाईक प्रवास

**माणगाव : प्रतिनिधी**

भारताच्या उत्तरेकडील हिमालयाच्या पायथ्यापासून ते दक्षिणेच्या अथांग समुद्र किनाऱ्यापर्यंतचा जम्मू ते कन्याकुमारी हा प्रवास अनेकांच्या स्वप्नात असतो, मात्र हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचे धाडस मोजक्याच जणांकडे असते. माणगाव शहरातील कन्या अपेक्षा राय-शेट्टी हिने तब्बल चार हजार किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा सोलो प्रवास करून हे स्वप्न साकार केले असून तिच्या या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



भारताच्या उत्तर ते दक्षिण कण्याला स्पर्श करणाऱ्या या प्रवासात अपेक्षा शेट्टी हिने १२ राज्यांतून प्रवास करत भारताची विविधता आणि संस्कृती जवळून अनुभवली. जम्मू, पंजाब, उत्तराखंड, दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमधून प्रवास करत ती अखेर कन्याकुमारीपर्यंत पोहोचली. या संपूर्ण प्रवासाने तिच्यासाठी आयुष्यातील एक अविस्मरणीय अध्याय निर्माण केला. हा प्रवास केवळ अंतर कापण्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो जिद्द, सुरक्षितता आणि जबाबदारी यांचा खरा अनुभव देणारा ठरला.

विशेष म्हणजे, अपेक्षा शेट्टीचे बालपण माणगाव शहरातच गेले. तिचे शिक्षण माणगाव कनिष्ठ महाविद्यालयात पूर्ण झाले. ती माणगावातील श्रद्धा इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका हेगडे मॅडम यांची सुकन्या आहे. त्यामुळे तिच्या या यशामुळे माणगाव शहरातही अभिमानाची भावना व्यक्त केली जात आहे. सध्या अपेक्षा शेट्टी या के. रहेजा कॉर्प, बीकेसी या प्रतिष्ठित संस्थेत लर्निंग अँड डेव्हलपमेंट स्पेशालिस्ट म्हणून कार्यरत आहेत. व्यावसायिक आयुष्यातील जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी केलेला हा साहसी प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. भारताच्या कण्यावरून केलेली ही चार हजार किलोमीटरची सोलो राईड तिच्यासाठी केवळ एक साहसी राईड नव्हती, तर स्वतःला पुन्हा शोधण्याचा, स्वतःवर विश्वास ठेवण्याचा आणि आयुष्याकडे नव्या नजरेने पाहण्याचा प्रेरणादायी प्रवास ठरला आहे.

## पेण शहरात भिक्खु महासंघाचे आगमन

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा या संस्थेच्या माध्यमातून रायगड जिल्हा अंतर्गत पेण तालुका शाखाच्या वतीने वाशी येथील लुंबिनी बुद्ध विहार येथे श्रामणेर शिबिराचे आयोजन ७ ते १६ मार्च या दरम्यान करण्यात आले असून याचे उद्घाटन महासभेचे रायगड जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे यांच्या हस्ते झाले.

या श्रामणेर शिबिरास बसलेल्या भिक्खु संघाचे आगमन शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ होऊन संघाने अभिवादन करून प्रस्थान शहराच्या बौद्धनगरपासून पुढे डोंगरी येथील विहारापर्यंत करण्यात आले.

या दरम्यान भिक्खु संघाचे बौद्ध बांधवांकडून ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रीय शिक्षक राजेंद्र बाविस्कर, तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, माजी नगरसेवक सभापती जाधव यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.



# केकेआर संघात मुझाराबानीची एन्ट्री!

## मुस्तफिजुरच्या जागी आयपीएलमध्ये खेळणार




**कोलकाता : वृत्तसंस्था**

बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारामुळे बीसीसीआयने कोलकाता नाईट रायडर्स संघातील बांगलादेशचा स्टार वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान याला आयपीएलमधून बाहेर काढले होते. त्याच्या अनुपस्थितीत केकेआरचा संघ कुणाला खेळवणार हा प्रश्न साऱ्यांनाच पडला होता. या प्रश्नाचे अखेर उत्तर मिळाले असून सहा फूट आठ इंच उंचीचा गोलंदाज ब्लेसिंग मुझाराबानी त्यांच्या ताफ्यात दाखल झाला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि विविध टी-२० लीगमध्ये आपल्या वेगाने आणि बाऊन्सने सर्वांना प्रभावित करणारा मुझाराबानी आपल्या गोलंदाजीसाठी ओळखला जातो. विशेष म्हणजे आयपीएलमध्ये करारबद्ध होणारा तो सिकंदर रझानंतर झिम्बाब्वेचा दुसरा खेळाडू आहे. नुकत्याच झालेल्या टी-२० वर्ल्डकपमध्ये त्याने ऑस्ट्रेलियाला संघाला नाकीनऊ आणले होते.

केकेआरचे प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांनी मुझाराबानीच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर मुझाराबानीचा वेग आणि उंचीचा फायदा संघाला होईल, असा विश्वास मॅनेजमेंटला वाटत आहे. केकेआरने यंदाच्या हंगामासाठी आपल्या गोलंदाजी विभागात विविधता आणण्यावर भर दिला आहे. मुझाराबानीच्या समावेशामुळे संघाला डेथ ओव्हर्समध्ये एक चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे.

मुझाराबानीने झिम्बाब्वेसाठी आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या सामन्यांत चमकदार कामगिरी केली आहे. तो सातत्याने १४० किमी प्रतितासपेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करण्यात सक्षम आहे.

# आमदार चषक क्रिकेट स्पर्धेत रंगतदार सामने

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या करावे येथील कै. गणपतशेठ तांडेल मैदानात सुरू असलेल्या आमदार चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेचा दुसरा दिवसही मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात पार पडला. स्थानिक क्रीडाप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मैदानावर दिवसभर उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. आमदार मंदा म्हात्रे यांनी केलेल्या उत्तम नियोजनाने खेळाडूंनी आनंद व समाधान व्यक्त केले.



शनिवारी दिवसभर झालेल्या सामन्यांमध्ये विविध संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. भर उन्हात फलंदाजांनी आकर्षक फटकेबाजी करत धावांचा पाऊस पाडला, तर गोलंदाजांनीही अचूक मारा करत प्रतिस्पर्धी संघांना रोखण्याचा प्रयत्न केला. उत्कृष्ट क्षेत्ररक्षणामुळे अनेक रोमांचक क्षण निर्माण झाले. प्रेक्षकांनी प्रत्येक क्षणाचा आनंद घेत खेळाडूंना जोरदार दाद दिली.

स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. संपूर्ण मैदानात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. स्पर्धेचे आयोजन शिस्तबद्ध आणि उत्तम पद्धतीने करण्यात आले असून खेळाडू व प्रेक्षकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत पोलीस पाटील दिलीप पाटील, पुण्यनाथ तांडेल, अश्विन पाटील, योगेश तांडेल, मिलिंद भोईर, विरचंद्र तांडेल, गुरूनाथ तांडेल, शिवम तांडेल, विरसेन तांडेल, मिलिंद कडू तसेच कार्यकर्ते व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तुर्भे येथे बिग बॅश क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

उत्तर भारतीय संघटना नवी मुंबईच्या वतीने तुर्भे येथे बिग बॅश (बीबीएल सीझन-२) या चार दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १२ ते १५ मार्चदरम्यान होत असून यात एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत.

स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना आपली क्रीडा प्रतिभा दाखवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. स्पर्धेचे उद्घाटन नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक राजेश शिंदे, भाजप अल्पसंख्याक नेते अख्तर अली चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दीपक सिंह आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत विजेत्या संघांना आकर्षक रोख पारितोषिक आणि चषक प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेचे नियोजन संघटनेचे अध्यक्ष रामस्वरूप दहिया आणि कार्याध्यक्ष कमलेश वर्मा यांनी केले आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रवि राठोड तसेच संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रयत्न करत आहेत.

# बांगलादेश-पाकिस्तानमधील दुसऱ्या वनडेत धावबादवरून वाद

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानच्या डावादरम्यान धावबादच्या निर्णयावरून मैदानात मोठा राडा झाला. पाकिस्तानच्या डावातील ३९व्या षटकात बांगलादेशचा कर्णधार मेहदी हसन मिराजने पाकिस्तानी फलंदाज सलमान अली आगा याला ज्या पद्धतीने बाद केले त्यावरून या वादाला तोंड फुटले.



प्रथम फलंदाजी करत असताना सलमान आगा याच्या आक्रमक खेळीमुळे पाकिस्तानचा संघ मोठ्या धावसंख्येच्या दिशेने आगेकूच करत होता. यादरम्यान ३९व्या षटकातील चौथ्या चेंडूवर बांगलादेशचा कर्णधार मेहदी हसन मिराज याने सलमान आगाला अजब पद्धतीने धावबाद केले. मिराजने टाकलेला चेंडू पाकिस्तानी फलंदाज मोहम्मद रिझवानने समोरच्या दिशेने तटवला. तेवढ्यात मिराजने चेंडू पायाने अडवला, मात्र यादरम्यान नॉन स्ट्रायकर एंडला असलेला सलमान आगा व गोलंदाज मिराजची टक्कर झाली.

सलमान आगा तेव्हा क्रिझच्या बाहेर होता तसेच चेंडू पायाजवळ थांबल्याने तो डेड झाला असावा असे वाटून आगा तिथेच थांबला तसेच त्याने खाली वाकून चेंडू उचलण्याचा प्रयत्न केला, मात्र तेवढ्यात मेहदी हसन मिराजने चपळाई दाखवत चेंडू हातात घेतला आणि स्टंपवर फेकला. यष्ट्या उडाल्यावर मिराजने जोरदार अपील केले. गोंधळलेल्या सलमान आगाला काय झाले हेच कळले नाही. तोपर्यंत पंचांनी निर्णय तिसऱ्या पंचांकडे सोपवला. तिसऱ्या पंचांनी रिप्ले पाहून सलमान आगाला धावबाद ठरवले.

### चाहत्यांमध्ये वेगवेगळ्या प्रतिक्रिया

पंचांनी धावबाद ठरवल्याने सलमान आगा कमालीचा नाराज झाला तसेच नाराजी व्यक्त करतच त्याने मैदान सोडले. यादरम्यान, सलमानाने ६२ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांसह ६४ धावा फटकावल्या. आता या घटनेनंतर मेहदी हसन मिराजने खिलाडूवृत्ती दाखवली नाही का? सलमान आगा हा खरोखरच धावबाद होता का? पंचांनी निर्णय देताना विचार केला नाही का? या प्रश्नांवरून समाजमाध्यमांवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

# बीसीसीआयच्या वार्षिक पुरस्कारांचे आज वितरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरी आणि योगदानाचा सन्मान करण्यासाठी बीसीसीआय पुरस्कार २०२६चे आयोजन करण्यात आले आहे. हा पुरस्कार सोहळा रविवारी (दि.१५) नवी दिल्ली येथे होणार आहे. हे पुरस्कार बोर्ड दरवर्षी विविध श्रेणींमध्ये खेळाडू, माजी खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांना प्रदान करते. यावर्षी कुणाला कोणता पुरस्कार मिळेल ते जाहीर झाले आहे.

बीसीसीआयने जाहीर केले आहे की, भारतीय कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिलला पुरुषांसाठी सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून पॉली उम्रीगर पुरस्कार प्रदान केला जाईल. गिलला हा पुरस्कार सलग दुसऱ्यांदा मिळणार आहे. स्मृती मानधनाला महिलांसाठी सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू पुरस्कार प्रदान केला जाईल, जो तिच्या कारकिर्दीतील पाचवा सन्मान आहे.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईच्या इरा जाधवला देशांतर्गत सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूसाठी जगमोहन दालमिया ट्रॉफी मिळेल. हरियाणाच्या शेफाली वर्माला वरिष्ठ देशांतर्गत एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूसाठी जगमोहन दालमिया ट्रॉफी मिळेल. दरम्यान, मुंबईच्या आयुष म्हात्रेला देशांतर्गत मर्यादित षटकांच्या स्पर्धांमध्ये सर्वोत्तम ऑलराउंडरसाठी लाला अमरनाथ पुरस्कार मिळेल. विदर्भाच्या हर्ष दुबेला रणजी ट्रॉफीमध्ये सर्वोत्तम ऑलराउंडरसाठी लाला अमरनाथ पुरस्कार मिळेल.

शिवाय, मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए)ला पुन्हा एकदा बीसीसीआय देशांतर्गत स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरीचा पुरस्कार मिळेल, ज्याने चार ट्रॉफी जिंकल्या आहेत आणि दोनमध्ये उपविजेतेपद मिळवले आहे. या वर्षीच्या पुरस्कारांमध्ये पाच आयसीसी ट्रॉफी जिंकणाऱ्या भारतीय संघांनाही सन्मानित केले जाईल.

# शिवम दुबेने मुंबईत घेतले दोन आलिशान फ्लॅट



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताने सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर संघातील अनेक खेळाडू चर्चेत आले आहेत. विशेषतः संजू सॅमसन आणि इशान किशन यांच्याबद्दल जोरदार चर्चा सुरू आहे, मात्र या सर्वांमध्ये आणखी एक नाव वेगळ्या कारणामुळेही चर्चेत आले आहे ते म्हणजे शिवम दुबे. याच शिवमने आता मुंबईत दोन आलिशान फ्लॅट खरेदी केल्याचे वृत्त आहे.

शिवमने वर्ल्डकप सेमीफायनल आणि फायनलमध्ये छोटी पण धडाकेबाज खेळी करून संघाला विजयापर्यंत पोहचवले. विश्वचषकाच्या फायनलनंतर दुबे ट्रेनने प्रवास करताना दिसला. कोट्यवधी रुपये कमावणारा क्रिकेटपटू इतक्या साधेपणाने प्रवास करीत असल्याने सोशल मीडियावर त्याची चर्चा झाली. आता तो पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, पण यावेळी कारण आहे मुंबईतील त्याची मालमत्ता.

वृत्तानुसार शिवम दुबेने मुंबईत गेल्या वर्षीच कोट्यवधी रुपयांचे दोन फ्लॅट खरेदी केले. जून २०२५मध्ये मुंबईतील ओशिवरा परिसरात हे फ्लॅट घेतले आहेत. या दोन्ही फ्लॅटची एकत्रित किंमत २७.५० कोटी रुपये असल्याचे समोर आले आहे. या व्यवहारासाठी दुबेने मोठी स्टॅम्प ड्युटीही भरली आहे.

ठाणे जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# प्रमुख संघांमध्ये आता निर्णायक लढतींचा थरार

**ठाणे : प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू, छत्रपती शिवाजी महाराज संघांनी किशोर; तर ज्ञानशक्ती मंडळ, किल्ले माऊली यांनी किशोरी गटात ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी खासदार चषक कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. ज्ञानशक्ती युवा, ओम् वर्तकनगर यांनी महिला गटात उपांत्य फेरी गाठली.



कळवा, खारेगाव येथील मैदानात सुरू असलेल्या किशोर गटाच्या उपांत्य सामन्यात राजर्षी छत्रपती शाहू संघाने श्री हनुमान सेवाचा प्रतिकार ४१-३३ असा मोडून काढत अंतिम फेरी गाठली. विश्रांतीला २२-१६ अशी आघाडी घेणाऱ्या शाहू संघाने विश्रांतीनंतरदेखील आपली आघाडी कमी होणार नाही याची काळजी घेत आठ गुणांच्या फरकाने सामना आपल्या नावे केला. हिमांशु जैसवाल, कृष्णा सोनदिया यांच्या तुफानी चढाया त्यांना शनिकुमार हरिजन, अभिमन्यू यादव यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे त्यांना ही किमया साधता आली. श्री हनुमानकडून वेदांत शिंदे, सायमन पवार, साहिल जळगावकर यांनी कडवा प्रतिकार केला.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात छत्रपती शिवाजी महाराज संघाने अविनाश मंडळावर ४३-३४ अशी मात केली. पहिला लोण देत छत्रपतीने पूर्वार्धात २२-०९ अशी आघाडी घेतली, पण उत्तरार्धात त्या लोणची परतफेड करीत सामन्यात रंगत आणली. अमित गुप्ता, अभव वर्मा, लकी ढोंगे यांनी छत्रपती संघाकडून, तर प्रियांशु राजपूत, प्रित म्हात्रे, दीपक कानोजिया यांनी अविनाश मंडळाडून उत्कृष्ट खेळ केला.

किशोरी गटाच्या उपांत्य सामन्यात ज्ञानशक्ती मंडळाने पहिल्या डावातील १४-१५ अशा पिछाडीवरून जय अंबे मंडळाचे आव्हान ३४-३० असे परतवून लावले. जान्हवी पार्टे, मानसी गावकर, ऐश्वर्या खैरे यांच्या उत्कृष्ट खेळाने जय अंबे संघाला एका गुणाची आघाडी मिळवून दिली होती, पण ज्ञानशक्तीच्या निधी राजोळे, हिमानी गायकवाड, धानी राणे यांनी दुसऱ्या डावात टॉप गिअर टाकला आणि लोण देत संघाला विजयाच्या मार्गावर आणले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात किल्ले रायगड संघाने जय भारत स्पोर्ट्सचा ३८-२४ असा पाडाव करीत अंतिम फेरी गाठली. मध्यंतराला १४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या किल्ले रायगडने मध्यंतरानंतरदेखील आपल्या खेळातील जोश कायम राखत १४ गुणांच्या फरकाने हा विजय साकारला.

महिलांच्या उपांत्यपूर्व सामन्यात ज्ञानशक्ती युवा संघाने जय अंबे मंडळाचा कडवा विरोध ३१-२५ असा मोडून काढला. जय अंबेच्या देवयानी पाटील, पल्लवी बनसोडे यांनी चतुरस्त्र खेळाने संघाला पूर्वार्धात १६-१३ अशी आघाडी दिली होती, पण उत्तरार्धात निधी राजोळे, सानिया गायकवाड, यतिक्षा लबडे यांनी आपला खेळ अधिक उंचावत ज्ञानशक्ती युवाला विजय मिळवून दिला.

दुसऱ्या सामन्यात ओम् वर्तकनगर स्पोर्ट्सने वैष्णवी साळुंखे, पूजा जाधव, पूर्वा इंगवले यांच्या चढाई पकडीच्या सर्वांगसुंदर खेळाच्या जोरावर रा.फ. नाईक संघाचा ३८-१३ असा धुव्वा उडविला. नाईक संघाची आरती शेळके चमकली. या दोन्ही विजयी संघांनी उपांत्य फेरी गाठली.

# विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी पनवेलच्या तिघांची मुंबई संघात निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बोर्ड ऑफ वेटरन्स क्रिकेट इन इंडिया (बीव्हीसीआय)च्या वतीने झोनल क्रिकेट सिलेक्शन टुर्नामेंट आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी मुंबईच्या संघात पनवेल परिसरातील तिघांचा समावेश झाला आहे.

यामध्ये पनवेलमधील सुखम हॉस्पिटलचे डॉ. संतोष जाधव हे मुंबई मास्टर्स संघाचे उपकर्णधार आहेत. आशा हॉस्पिटल कळंबोली येथील डॉ. चंद्रकांत शिंदे व डॉ. अरविंद खुटारकर यांचीही ४० वर्षावरील वयोगटातील मुंबईच्या संघात निवड झाली आहे.

मुंबई मास्टर्स संघ यंदा रवी धुरी यांच्या नेतृत्वाखाली ११ ते १५ मार्चदरम्यान नांदेड येथे, महाराष्ट्र, गोवा आणि विदर्भ संघांविरुद्ध सामने खेळणार आहे. मुंबई संघात अभिजीत गौतम (यष्टीरक्षक), डॉ. प्रसाद सावंत यांचाही समावेश असून या स्पर्धेत उत्तम कामगिरी करणारे खेळाडू इंडिया सिलेक्शनसाठी खेळतील.

### काव्या मारनच्या अडचणीत वाढ

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील द हंड्रेड स्पर्धेसाठी पाकिस्तानी फिरकीपटू अबरार अहमद याला करारबद्ध करण्याचा निर्णय काव्या मारनच्या सनरायझर्स लीड्स संघाला महागात पडताना दिसत आहे. या निवडीमुळे सोशल मीडियावर भारतीय चाहत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून या वादादरम्यान संघाचे अधिकृत ‘एक्स’ खाते सस्पेंड झाले आहे.

‘द हंड्रेड’च्या लिलावात सनरायझर्स लीड्सने अबरार अहमदला सुमारे २.३४ कोटी रुपयांना खरेदी केले. या स्पर्धेत भारतीय मालकीच्या चार फ्रँचायझी असून फक्त सनरायझर्सनेच पाकिस्तानी खेळाडूला संधी दिली. या निर्णयामुळे भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये संतापाची लाट उसळली.

दरम्यान, संघाचे ‘एक्स’ खाते तांत्रिक कारणामुळे बंद झाले आहे की वाढत्या विरोधामुळे यावर फ्रँचायझीने अद्याप अधिकृत भाष्य केलेले नाही, मात्र अबरार अहमदला संघातून मुक्त करावे, अशी मागणी नेटकऱ्यांकडून जोर धरत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com